रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक २२५
www.ramprahar.com

◆ बुधवार, ४ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

म्हसळ्यात बेपत्ता विवाहितेचा मृतदेह सापडला/२
शर्यतीचा बैल चोरणारा आरोपी जेरबंद/५
टी-२० वर्ल्डकपमध्ये आज पहिली उपांत्य लढत/८

## भारताचे रशियासोबत दोन महत्त्वपूर्ण संरक्षण करार



**नवी दिल्ली** : भारताने आपली सागरी सुरक्षा आणि हवाई संरक्षण क्षमता मजबूत करण्यासाठी दोन संरक्षण करारांना मान्यता दिली आहे. संरक्षण मंत्रालयाने ५,०८३ कोटी रुपयांच्या दोन प्रमुख संरक्षण करारांवर मंगळवारी (दि. ३) स्वाक्षरी केली, ज्यामध्ये भारतीय तटरक्षक दलासाठी सहा प्रगत हलके हेलिकॉप्टर एम के-३ खरेदी आणि भारतीय नौदलासाठी उभ्या प्रक्षेपण शिटिल जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली समाविष्ट आहे. या करारांमुळे किनारी आणि किनाऱ्यावरील देखरेख क्षमता वाढतील आणि युद्धनौकांच्या बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणालीलादेखील बळकटी मिळेल. संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की, हा करार भारत आणि रशियामधील दीर्घकालीन धोरणात्मक संरक्षण सहकार्याचे प्रतिबिंब दर्शवितो. या दोन्ही करारांमुळे भारतीय नौदल आणि तटरक्षक दलाची ऑपरेशनल तयारी वाढेल.

### आखाती देशांत अडकलेल्या भारतीयांसाठी ’रेस्क्यू ऑपरेशन’

# विशेष विमाने मायदेशी दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य पूर्व आशियात इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या भीषण संघर्षामुळे आखाती देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या तणावाच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या भारतीय नागरिकांना सुरक्षित मायदेशी आणण्यासाठी सरकारने तातडीची पावले उचलली आहेत. गेल्या २४ तासांत आखाती देशांतून विशेष विमाने भारतातील विविध शहरांमध्ये दाखल झाली आहेत.



युद्धामुळे इराणसह ११ देशांच्या हवाई हद्दीतून उड्डाणांवर निर्बंध आल्याने शेकडो नियमित उड्डाणे रद्द झाली आहेत. अशा परिस्थितीत तेथे अडकलेल्या प्रवाशांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार विशेष उड्डाणांद्वारे शेकडो प्रवासी विविध विमानतळांवर उतरले आहेत. सर्वाधिक प्रवासी मुंबई आणि दिल्ली या दोन शहरांत दाखल झाले असून येथे विशेष मदत कक्ष उभारण्यात आले आहे. याशिवाय दक्षिण भारतातील प्रवाशांसाठी बंगळुरू, कोची आणि चेन्नई ही प्रमुख केंद्र असून दुबई व अबु धाबीवरून आलेली विमाने येथे उतरली आहेत. जेद्दाह आणि शारजाह येथून अहमदाबाद आणि हैदराबाद या शहरांत विमाने दाखल झाली आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, आखाती देशांत असलेल्या सुमारे एक कोटी भारतीयांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. भारतीय दूतावासांनी हेल्पलाइन क्रमांक जारी केले असून गरज भासल्यास ’ऑपरेशन सिंधू’प्रमाणेच मोठी बचाव मोहीम राबवण्याची तयारीही सरकारने करून ठेवली आहे.

या संकटकाळात आखाती देशांत अडकलेल्या भारतीय नागरिकांना, विशेषतः महाराष्ट्रातील हजारो कामगार आणि पर्यटकांना सुरक्षित मायदेशी आणण्यासाठी केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने युद्धपातळीवर समन्वय राखून मोठी मदत केली आहे. गेल्या २४ तासांत आखाती देशांतून विशेष विमाने मुंबई आणि दिल्लीच्या विमानतळांवर दाखल झाली असून प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेबद्दल प्रवाशांनी सरकारचे आभार मानले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली परराष्ट्र मंत्रालयाने तत्काळ कंट्रोल रूम स्थापन केली. त्याचवेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी केंद्र सरकारशी सतत संपर्क साधून राज्यातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष प्रयत्न केले. दिल्लीत उतरणाऱ्या महाराष्ट्रीयन प्रवाशांसाठी महाराष्ट्र सदनमध्ये राहण्याची आणि जेवणाची सोय करण्यात आली तसेच मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर राज्य सरकारने स्वतंत्र मदत कक्ष सुरू केला आहे.

महाराष्ट्र सरकारने प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल ऑफिसर नेमले आहेत, जे परतणाऱ्या नागरिकांची त्यांच्या गावी जाण्याची सोय करत आहेत. विमानतळावरून एसटी महामंडळाच्या विशेष बसेसद्वारे प्रवाशांना पुणे, नाशिक आणि कोल्हापूरसारख्या शहरात मोफत पोहचवण्यात येत आहे. युद्धभूमीतून आलेल्या नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी विमानतळावरच केली जात आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार अजूनही काही नागरिक अबु धाबी आणि मस्कतमध्ये अडकलेले असू शकतात. त्यांच्यासाठी आणखी विशेष उड्डाणे मुंबई आणि दिल्लीसाठी नियोजित आहेत. महाराष्ट्र सरकारने स्पष्ट केले आहे की, राज्यातील शेवटचा नागरिक सुरक्षित परत येईपर्यंत आमचे सरकार केंद्राच्या संपर्कात राहील. दरम्यान, आखाती संघर्षाच्या छायेत असताना मायदेशी परतलेल्या नागरिकांसाठी हे उड्डाण मोठा दिलासा ठरले असून उर्वरित नागरिकांच्या सुटकेसाठी वेगाने प्रयत्न सुरू आहेत.

### नागरिकांनी मानले सरकारचे आभार

भारतात विमानतळावर उतरल्यानंतर अनेक प्रवाशांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दुबईहून परतलेल्या मुंबईतील एका सॉफ्टवेअर इंजिनिअरने सांगितले, तिथे परिस्थिती अत्यंत तणावाची होती. विमान उड्डाणे रद्द होत होती, पण भारतीय दूतावासाने आम्हाला सतत अपडेट्स दिले आणि राज्य सरकारने मुंबईत उतरल्यानंतर घरी जाण्यासाठी जी वाहतूक व्यवस्था केली, ती कौतुकास्पद आहे. केंद्र आणि महाराष्ट्र सरकारचे आम्ही ऋणी आहोत. जेद्दाहवरून परतलेल्या एका कामगाराने मुख्यमंत्री आणि परराष्ट्रमंत्र्यांचे आभार मानताना म्हटले, आमच्यासाठी ही दुसरी दिवाळीच आहे. सरकारने वेळीच विमान पाठवले नसते, तर आम्ही तिथेच अडकून पडलो असतो. सरकारचे आभार!

# रायगडात होळी आणि धुळवड उत्साहात साजरी

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात होळी आणि त्यानंतर येणारा धुळवडीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सणाच्या निमित्ताने चाकरमानी मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात दाखल झाले होते. सोमवारी रात्री जिल्ह्यात ठिकठिकाणी चार हजारहून अधिक होळ्यांचे दहन करण्यात आले, तर मंगळवारी अबालवृद्धांनी एकमेकांना रंग लावून धुळवडीचा सण उत्साहात साजरा केला.

रायगडातील अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, उरण या तालुक्यांना विस्तीर्ण असा समुद्र किनारा लाभला आहे. सलग चार दिवस सुट्ट्या आल्याने पर्यटक मोठ्या संख्येने रायगड जिल्ह्यात दाखल झाले. त्यांच्याबरोबरच स्थानिक गावकरी, शहरातील नागरिक मोठ्या संख्येने आल्याचे पहायला मिळाले. स्थानिकांबरोबरच आलेल्या पर्यटकांनी धुळवड साजरी करीत समुद्र स्नानाचा आनंद लुटला.

होळीच्या सणाच्या निमित्ताने गावागावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. देवदेवतांच्या पालख्या काढण्यात आल्या. जिल्ह्यात यंदा दोन हजार हजार ९४० सार्वजनिक, तर एक हजार १२० खासगी अशा एकूण चार हजार ८० होळ्यांचे दहन करण्यात आले.

होळीनंतर मंगळवारी सकाळपासून उत्तर रायगडात धुळवडीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. अबालवृद्धांनी एकमेकांना रंग लावून होळीच्या शुभेच्छा दिल्या. यात तरुणाई आघाडीवर होती. होळकऱ्यांचे घोळके ढोल-ताशे वाजवत गल्लोगल्ली रंग उधळत फिरत होते. अलिबाग समुद्रकिनारी रंग खेळणाऱ्यांची जणू जत्राच भरली होती. रंगात रंगलेले होळकरी नंतर समुद्रात डुंबायला उतरले.

बच्चेकंपनीच्या हातात पिचकारी, तर तरुणाईच्या हातात रंग होते. होळकऱ्यांचे जथ्थेच्या जथ्थे नाक्या-नाक्यावर बुरा ना मानो होली है! म्हणत सर्वांना वेगवेगळ्या रंगात रंगवून टाकत होते. रंगाच्या या सणात तरुणाईबरोबरच वयोवृद्ध ही सहभागी झाले होते.

दरम्यान, होळी आणि धुलिवंदनाच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.



# राज्यसभेसाठी भाजपची पहिली यादी जाहीर

### राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपने राज्यसभेसाठी नऊ नावांची पहिली यादी घोषित केली आहे. या यादीत पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांच्या नावाचाही समावेश आहे. भाजपने त्यांना बिहारमधून राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यसभेच्या एकूण ३७ जागांसाठी निवडणूक होणार आहेत. सध्या भाजपने पहिल्या यादीत नऊ नावे जाहीर केली आहेत. या यादीनुसार बिहार, आसाम, ओडिशातील प्रत्येकी दोन आणि छत्तीसगड, हरियाणा, ओडिशातील प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश आहे.

भाजपने बिहारमधून नितीन नवीन आणि शिवेश कुमार, आसाममधून तेराश गोवाला आणि जगीन मोहन, छत्तीसगडमधून लक्ष्मी वर्मा यांची नावे जाहीर केली आहेत. याशिवाय यादीत हरियाणातून संजय भाटिया, पश्चिम बंगालमधून राहुल सिन्हा, तर ओडिशामधून मनमोहन सामल आणि सुजित



कुमार यांना उमेदवारी दिली आहे.

निवडणूक आयोगानुसार राज्यसभेच्या निवडणुका ज्या राज्यांमध्ये होणार आहेत त्यात महाराष्ट्र (सात जागा), तामिळनाडू (सहा जागा), पश्चिम बंगाल आणि बिहार (प्रत्येकी पाच जागा), ओडिशा (चार जागा), आसाम (तीन जागा), तेलंगणा, छत्तीसगड आणि हरियाणा (दोन जागा), तर हिमाचल प्रदेश (एक जागा) यांचा समावेश आहे. या सर्व जागांसाठी १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान होईल आणि त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणी करण्यात येईल.

## युद्धस्थितीमुळे जेएनपीए बंदरात अडकले कंटेनर्स

**उरण : वार्ताहर**

इराण-इस्रायल संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनी आणि लाल समुद्रातील धोका वाढल्याने मालवाहू जहाजांचे मार्ग बदलले आहेत. आखाती देशांमधील या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्यातीवर मोठा परिणाम झाला असून कोट्यवधी रुपयांचा माल जेएनपीए बंदरात अडकला आहे.

जेएनपीए बंदरात अडकलेल्या सुमारे १२०० कंटेनरमधील मालाची एकूण किंमत २५० कोटी ते ३०० कोटींच्या आसपास असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे.

# युद्धसंघर्ष : पंतप्रधान मोदींचा आठ देशांशी संवाद

### भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानेही स्पष्ट केली भूमिका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल युद्ध आखातामध्ये अनेक आघाड्यांवर पसरलेले दिसून आले. अद्यापही हल्ले सुरूच आहेत. यातच भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी करून भूमिका स्पष्ट केली आहे. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ४८ तासांत आठ देशांच्या प्रमुखांची चर्चा केली आहे.

पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त अरब अमिराती, इस्रायल, सौदी अरेबिया, जॉर्डन, बहरीन, ओमान, कुवैत आणि कतार या आठ देशांच्या प्रमुखांची संवाद साधला. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही काही देशातील समपदस्थांशी चर्चा केल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी म्हटलेय की, २८ फेब्रुवारी रोजी इराण आणि आखाती प्रदेशात संघर्ष सुरू झाला तेव्हा आम्ही तीव्र चिंता व्यक्त केली होती. त्यावेळीही भारताने सर्व बाजूंना संयम बाळगण्याचे, तणाव वाढू नये आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले होते. दुर्दैवाने रमजानच्या पवित्र महिन्यात या प्रदेशातील परिस्थिती लक्षणीयरीत्या आणि सतत बिघडली आहे. सुरक्षा आणि स्थिरतेत महत्त्वपूर्ण वाटा असलेला जवळचा शेजारी म्हणून या घडामोडी चिंता निर्माण करतात.

या संघर्षात अडकलेल्यांना सर्वतोपरी मदत केली जात आहे. आम्ही या प्रदेशातील सरकार तसेच इतर प्रमुख भागीदारांच्या संपर्कात आहोत. सरकार बदलत्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून राष्ट्रीय हितासाठी संबंधित निर्णय घेत राहील, असेही निवेदनातून सांगितले गेले आहे.

### नागरिकांची सुरक्षा सर्वोच्च प्राथमिकता

आखाती प्रदेशात जवळजवळ एक कोटी भारतीय नागरिक राहतात आणि काम करतात. त्यांचे सुरक्षा आणि कल्याण ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. गेल्या काही दिवसांत अशा हल्ल्यांमुळे काही भारतीय नागरिकांनी आपले प्राण गमावले आहेत किंवा बेपत्ता आहेत. या पार्श्वभूमीवर भारत संवाद आणि मुत्सद्देगिरीचा पुनरूच्चार करतो. आम्ही संघर्ष लवकरात लवकर संपवण्याच्या बाजूने आहोत हे ठामपणे स्पष्ट करतो, असे निवेदनात नमूद आहे.

## निवडक

### युद्धग्रस्त इराणमध्ये भूकंपाचे धक्के; चर्चा मात्र अणुचाचणीची


**तेहरान** : आधीच युद्धाच्या भीषण आगीत होरपळत असणाऱ्या इराणमध्ये आता भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. इराणमधील गेराश भागात ४.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला असल्याची माहिती अमेरिकन भूवैज्ञानिक सर्वेक्षणाने दिली. या भूकंपाचा केंद्रबिंदू १० किलोमीटर जमिनीखाली होता. दरम्यान, हा भूकंप म्हणजे नक्की नैसर्गिक आपत्ती होती की, इराणने ऐन युद्धात अणुचाचणी केली यावर आता शंका उपस्थित केली जात आहे.

### पीएम मोदींच्या युट्यूब चॅनेलचे तीन कोटी सबस्क्राइबर्स पार

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल क्षेत्रात आपला वरचष्मा कायम राखत यूट्यूबवर ३० मिलियन म्हणजेच तीन कोटी सबस्क्राइबर्सचा ऐतिहासिक टप्पा पार केला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून थेट जनतेशी संवाद साधण्याच्या प्रभावी शैलीमुळे मोदींनी जागतिक स्तरावर इतर बलाढ्य नेत्यांना मोठ्या फरकाने मागे टाकले आहे. यामुळे जागतिक व्यासपीठावर सर्वाधिक फॉलो केले जाणारे राजकीय नेतृत्व म्हणून त्यांचे स्थान आता अधिक भक्कम झाले आहे.

# रायगडात पोपटीचा घमघमाट

### पाट्यांची धूम, गावठी वालाला सुगीचे दिवस




**नागोठणे : बातमीदार**

सध्या रायगड जिल्ह्यात वैशिष्ट्यपूर्ण आणि लज्जतदार पोपटीचा घमघमाट सुटला आहे. जिथे तिथे पोपटीचीच चर्चा व तयारी पहावयास मिळत आहे. त्यामुळे गावठी वालाला सुगीचे दिवस आले आहेत.

विदर्भात, खान्देशात ज्याप्रमाणे ज्वारी, बाजरीची कणसे भाजून केलेला हुर्डा प्रसिद्ध आहे; त्याप्रमाणेच रायगडात गावठी वालाच्या शेंगांची चविष्ट पोपटी चर्चेत असते. सध्या ठिकठिकाणी शेतावर किंवा घराबाहेर मोकळ्या जागेत या पोपटी पाट्यांची धूम पहायला मिळत आहे. येथे गप्पा-गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाणघेवाणही होते.

वालाच्या शेंगा भांबुर्डीच्यापाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजविल्या जातात. त्यामध्ये कांदा, बटाटा तसेच अंडी, चिकन घालून लज्जत वाढविली जाते. यालाच पोपटी असे म्हणतात. काळ्या मातीत पिकविलेल्या चवदार, टपोऱ्या दाण्याच्या गावठी शेंगांना पोपटीला अधिक पसंती असते. या स्थानिक शेंगा कितीही खाल्या तरी त्या पोटाला बाधत नाही हे त्यांचे वैशिष्ट आहे.

नागोठणेजवळील निडी येथील गावठी शेंगा महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. या परिसरातील जमिनीचा पोत कसदार असून परंपरागत पद्धतीने जपणूक करून ठेवलेल्या बियाण्याचा वापर येथे केला जातो. या वालाला विशिष्ट गोड चव तसेच शेंगेचा आणि दाण्याचा आकारही मोठा असतो. सुरुवातीस बांधावर आलेल्या शेंगांची चव तर अधिकच रूचकर असते.



# रायगडच्या कोळीवाड्यांमध्ये होळीचा उत्साह

**अलिबाग : प्रतिनिधी**

होळीच्या सणानिमित्त रायगड जिल्ह्यातील कोळीवाड्यांमध्ये उत्साह शिगेला पोहोचला होता. अलिबागसह मुरूड, श्रीवर्धन तालुक्यातील कोळीवाड्यांमध्ये रविवारी रात्री होळी सजवण्यात आल्या. कोळी भगिनींनी होळीची मनोभावे पूजा केली. काही ठिकाणी चलतचित्र देखावे उभारण्यात आले होते. त्यातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



रायगडच्या कोळीवाड्यांमध्ये होळीचा उत्साह वेगळाच असतो. किनारपटटीच्या भागात पोफळी किंवा केळीच्या होळ्या उभारण्यात आल्या. त्या फुलांच्या माळा तसेच इतर शोभेच्या वस्तूंनी सजवण्यात आला. त्यावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. अलिबागच्या कोळी वाड्यात प्रत्येक पाडयामध्ये वेगवेगळे आकर्षण होते. विविध देवदेवतांचे पौराणिक देखावे सादर करण्यात आले होते. ठिकठिकाणी चलतचित्र पाहण्यासाठी नागरीकांची गर्दी झाली होती. मधला पाडा येथील श्रीदत्त प्रतिष्ठानच्या देखाव्यातून कोळी समाजाचे जीवन दर्शन घडवण्यात आले. होळीच्या पूजनानंतर कोळी बांधव, भगिनींनी पारंपारिक वेशात सजून नटून पारंपरिक गाण्याच्या तालावर ठेका धरला. तर तरुणाई डीजेच्या गाण्यांवर बेधुंद होऊन नाचत होती.

होळीचा सण सुरू होण्यापूर्वीच कोळी बांधवांनी आपल्या होड्यांची डागडुजी आणि रंगरंगोटी केली. रंगीत कापडी पताका आणि झेंडे लावून होड्या सजवल्या आहेत. सोमवारी सकाळी होडीचे पूजन करून मान म्हणून मोठा मासा होडीला बांधण्यात आला. अलिबाग तालुक्यातील थळ, नवगाव, रेवस, बोडणी, आग्राव येथील कोळी बांधवांनी या सजवलेल्या होड्यांमधून समुद्रात फेरफटका मारला. यामुळे समुद्रात जणू होडयांची जत्रा भरल्याचे चित्र पहायला मिळाले. बच्चे कंपनीपासून मोठी मंडळी देखील पारंपरिक वाद्यांच्या तालावर नाचताना दिसत होती. अरबी समुद्रातील खांदेरी किल्ल्यावर जाऊन तेथील श्रीवेताळेश्वराचे दर्शन घेतले आणि यावेळेस मासळीचा हंगाम चांगला जाऊ दे, अशी प्रार्थना सुद्धा कोळी बांधवांनी केली.

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील गावोगावी २ मार्च रोजी मोठ्या उत्साहात महिला नागरिकांनी सायंकाळी ६ वाजल्यापासून होळी मातेची मनोभावे पूजा केली.एक मोठा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर पहावयास मिळत होता.त्यातच ताशा,खलैचा बाज्या व बेंन्जो,डीजे अशी वाद्य वाजत होती या वाद्यांच्या तालावर अध्यात्मिक पध्दतीने बालगोपाळांसह वयोवृध्दापर्यत नृत्य,तर काही सोंग करत होळी रात्री लावण्यात आली.



यावेळी गावागावांतून एकतेच्या प्रतिकांतून मोठा आनंद नागरिकांनी घेत वाद ,विवाद,वैरत्व या गोष्टींचे दहन केल्याचे चित्र पहावयास मिळाले.हे ग्रामीण भागातील माणुसकीचे खरे दर्शन सण-उत्सवांतून प्रत्यक्ष दर्शनी पहावयास मिळत आहेत.अशा प्रकारे आनंद लुटणाऱ्या होळी उत्सवाला एक वेगळीच मजा नागरिकांनी घेतली आहे.त्याच बरोबर दुसऱ्या दिवशी धुळीवंदन साजरा करताना सारा ग्रामीण भाग रंगानी न्हाऊन निघाला होता.चांगला आनंद नागरिकांनी घेतला गावागावांतून सायंकाळी पालखी काढण्यात आल्या. सर्वांनी भक्तीमय पध्दतीने दर्शन घेतले.

तळा शहरातही मोठ्या आनंदात होळी उत्सव व धुळवड साजरी करण्यात आली.ग्रामदेवता श्रीचंडिकामाता पालखी तळा शहरात पारंपरागत पद्धतीने फिरली. भाविकांनी मोठ्या प्रमाणात दर्शन घेतले.

## श्रीवर्धन तालुक्यात शिमग्याला मिरवणुकांमध्ये रंगली गावे

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यात पारंपरिक शिमगा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात साजरा करण्यात आला. कोकणातील लोकपरंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या या उत्सवाने संपूर्ण तालुक्यात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण केले.



गावोगावी ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुका काढण्यात आल्या. कलाकारांनी पारंपरिक राक्षसी, पौराणिक तसेच लोककलेतील विविध रूपे धारण करून ग्रामस्थांचे मनोरंजन केले. आकर्षक मुखवटे, रंगीत वेशभूषा आणि खास मेकअपमुळे मिरवणुकीत वेगळीच रंगत दिसून आली. काही ठिकाणी पारंपरिक नाट्यप्रकार आणि लोकनृत्यांचेही सादरीकरण करण्यात आले.

मिरवणुकीत लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ढोल, ताशा, टाळ आणि पारंपरिक वाद्यांच्या तालावर गावकरी नाचत होते. घरांच्या अंगणातून, गॅलरीतून आणि रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून नागरिकांनी या उत्सवाचा आनंद लुटला. अनेक ठिकाणी महिलांनीही पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला, ज्यामुळे उत्सवाची शोभा अधिक वाढली.

शिमगा हा सण वाईट शक्तींवर चांगुलपणाचा विजय, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचे प्रतीक मानला जातो. या निमित्ताने गावातील तरुणांनी पुढाकार घेत पारंपरिक कला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. अनेकांनी स्वयंप्रेरणेने मिरवणुकीच्या आयोजनात आणि व्यवस्थापनात सहभाग घेतला. शिमगा सण-उत्सवांमुळे गावातील ऐक्य अधिक दृढ होते आणि नव्या पिढीला आपल्या परंपरेची ओळख होते. ग्रामस्थांनी पुढील वर्षी अधिक भव्य स्वरूपात शिमगा साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## नवी मुंबईतील कोळीवाड्यांत पारंपरिक होलिकोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

वेगाने आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या नवी मुंबई शहरातही गावठाणांची संस्कृती आजही तितक्याच उत्साहाने जपली जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. विशेषतः येथील कोळीवाड्यांमध्ये कोळी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने 'होलिकोत्सव' साजरा करून संस्कृतीची परंपरा जिवंत ठेवली आहे.



बेलापूर परिसरातील दिवाळे कोळीवाडा येथे होळीच्या मध्यरात्री विधीपूर्वक होळी प्रज्वलित करण्यात आली. गावच्या वतीने पाटील दाम्पत्यांना मान देत त्यांच्या हस्ते अग्नी देण्यात आला. त्यानंतर कोळी बांधवांनी पारंपरिक कोळी नृत्य सादर करत होळीभोवती फेर धरला. ढोल-ताशांच्या गजरात आणि जोय जाय, जोय जाय अशा पारंपरिक गजरात परिसर दुमदुमून गेला. यामुळे खऱ्या अर्थाने उत्सवाला उधाण आले होते.

'शिमगा' हा कोळी समाजाचा अत्यंत महत्त्वाचा सण मानला जातो. या निमित्ताने आठवडाभर आधी होड्यांची रंगरंगोटी करून त्यांना रंगीत बावटे, पताका आणि मखमली झालरांनी सजवले जाते. संध्याकाळी होडीची पूजा करून तळलेला मासा आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवण्याची परंपरा आजही जपली जाते. पूजा संपल्यानंतर लहान मुलांचा फटाक्यांचा आनंद आणि तरुणाईचा जल्लोष यामुळे समुद्रकिनारा उत्साहाने फुलून जातो.

पूर्वीच्या काळी होळी पौर्णिमेला सादर केले जाणारे 'डांगऱ्या' हे विशेष नृत्य आजही काही ठिकाणी पाहायला मिळते. गुजरात-मध्यप्रदेशातील गरबा-दांडियालाही लाजवेल असा हा नृत्यप्रकार कोळी संस्कृतीचे वैशिष्ट्य मानला जातो. होळीच्या दुसऱ्या दिवशी राखेचा टिळा लावून रंगपंचमी साजरी केली जाते. गावातील चौकाचौकांत डीजेच्या तालावर तरुणाई नृत्य सादर करत एकत्रित जेवणाचा बेत आखते. यातून सामूहिक ऐक्य आणि बंधुभावाचे दर्शन घडते.

अलीकडच्या काळात काही ठिकाणी पारंपरिक होळीचा साज कमी होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. पूर्वी या सणातून सामूहिक ऐक्य आणि संस्कृतीची श्रीमंती अनुभवायला मिळायची; मात्र बदलत्या काळात काही परंपरा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. तरीही नवी मुंबईतील गावठाणे आणि कोळीवाडे येथे कोळी बांधव आजही परंपरा जपत 'होलिकोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करत असल्याचे आनंददायी चित्र पाहायला मिळते.

## कराडे गावची अनोखी होळी परंपरा; ग्रामस्थ लुटतात लुटुपूटू विवाहाचा आनंद

**खोपोली : प्रतिनिधी**

साखरपुडा, हळद होळीच्या माळावर लग्न आणि त्यानंतर निघणारी वरात सर्व काही लुटुपुटुच्या खेळासारख. होळी सणाच्या निमित्ताने कराडे गावात रंगणारा हा विवाह सोहळ्याचा आनंद ग्रामस्थ आनंदात लुटतात. या अनोख्या प्रथेत मुलींना महत्त्वाचे स्थान आहे. नवरा ,नवरी गावातले निवडले जातात. विशेष म्हणजे नवरा आणि नवरी दोघेही मुलीच असतात. सध्याच्या डिजिटल युगात ऑनलाइन लग्न पत्रिका छापून ग्रामस्थांना निमंत्रण दिले जाते. ठरल्याप्रमाणे साखरपुडा होतो. नवरीच्या हातावर मेहंदी काढून नवरी नटवली सजवली जाते. करवल्या देखील उत्साहात असतात. त्यानंतर हळदीचा कार्यक्रम आणि रात्री होळीच्या माळावर होणारा विवाह सोहळा याची अनोखी मजा कराडे गावात पाहायला मिळते.

त्यानंतर वाजत गाजत वरात काढली जाते. धुलीवंदन सणाच्या रंगांमध्ये अधिक रंग चढवणारा हा विवाह सोहळा परंपरा आणि तरुणाईला सण उत्सवा सोबत जोडून ठेवत आहे.



# खोपोलीत होळीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा

**खोपोली : प्रतिनिधी**

सोमवारी होळी सण पारंपारिक पूजा,अर्चा करून रात्री बारा वाजेपर्यंत संपूर्ण शहरात साजरा झाला. होळी रे होळी पुरणाची पोळी अशा बोंबा मारून मोठया उत्साहात गल्लोगल्ली होळी पेटविण्यात आल्या. तर मंगळवारी धुलीवंदनच्या दिवशी विविध रंगाची उधळण करीत बच्चे कंपनी पासून सर्व वयोगटातील तरून व महिला पुरुष आणि जेष्ठ नागरिकांनी धुलीवंदन महोत्सव आनंदात साजरा केला.

विविध सामाजिक उपक्रमांनी होळी साजरी केली गेली. होळी व धुलीवंदना निमित्ताने खोपोलीत विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते .यात गरीब व आदिवासी बांधवांसाठी खास होळी निमित्ताने पुरणपोळी वाटप , त्यांच्या सोबत धुळवन साजरी करण्यात आली . खोपोली हास्य क्लब कडून खास जेष्ठ नागरिकांसाठी धुलीवंदनाचे आयोजन करण्यात आले होते.

येथील अनेक रहिवासी सोसायटयांतून पुरणपोळीचा नैवेद्य होळीला दाखवून सर्व पुरणपोळया एकत्रित पणे जमा केल्या व त्या पुरणपोळया खोपोलीतील सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहभागाने शहरातील गरीब व आदिवासी वस्तीत जाऊन वाटल्या गेल्या . दोन दिवस होळी निमित्ताने सर्वत्र आनंदी व उत्सवाचे वातावरण होते.



## म्हसळ्यात बेपत्ता विवाहितेचा मृतदेह सापडला

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील दगडघूम - पाभरे परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून चिरेखाणीवर मजुरी करणारी २० वर्षीय विवाहित महिला मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

दगडघूम - पाभरे येथील चव्हाण यांच्या चिरेखाणीवर सतीश सुभाष चव्हाण (वय २२) व त्याची पत्नी निकीता सतीश चव्हाण (वय २०) हे दोघे मजुरीचे काम करत होते. काही दिवसांपूर्वी निकीता बेपत्ता झाल्याची तक्रार पती सतीश याने म्हसळा पोलीस ठाणे येथे दाखल केली होती.मात्र आज सकाळी दगडघूम कासेखोल भागात निकीताचा मृतदेह आढळून आल्याची माहिती समोर आली. तिच्या डोक्यावर गंभीर मारहाणीचे निशाण असून कवटी फुटल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मृतदेह निर्जन ठिकाणी टाकलेल्या अवस्थेत सापडल्याने हा खून असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



दरम्यान, निकीताचे वडील महादेव रामू राठोड हे मुलगी बेपत्ता असल्याची माहिती मिळताच गुलबर्गा (कर्नाटक राज्य) येथून तातडीने म्हसळ्यात दाखल झाले. मात्र येथे आल्यानंतर त्यांना मुलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी बातमी समजली. महादेव राठोड यांनी माध्यमांशी बोलताना जावई सतीश व त्याच्या काही साथीदारांनीच मुलीचा खून केल्याचा आरोप केला असून आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. अवघ्या आठ महिन्यांपूर्वी निकीताचा विवाह झाला होता, अशीही माहिती त्यांनी दिली. या घटनेमुळे म्हसळा तालुक्यात संतापाची लाट उसळली असून नागरिकांनी निष्पक्ष व सखोल चौकशीची मागणी केली आहे. रायगड पोलीस या प्रकरणाचा तपास करीत असून आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

## माणगावला काजूच्या बियांना मोठी मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणातील डोंगररांगा, घनदाट जंगल आणि उन्हाने तापलेली माती या साऱ्या कठीण परिस्थितीतही जगण्याची लढाई जिंकण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणगाव तालुक्यातील आदिवासी भगिनींच्या हातात आज रानमेव्याचे सोनं दडले आहे. सध्या माणगावच्या बाजारपेठेत काजूच्या ताज्या बियांना मोठी मागणी निर्माण झाली आहे.



### आदिवासी भगिनींच्या कष्टांना मिळतेय सोन्याची किनार

माणगाव तालुक्यातील दुर्गम आणि डोंगराळ भागात राहणारे आदिवासी बांधव रणरणत्या उन्हात, पायवाटांनी आणि जंगलवाटांनी फिरत काजूच्या बिया,करवंदे,जांभळे,कैऱ्या आणि इतर रानभाज्या गोळा करतात. हा रानमेवा म्हणजे त्यांच्या दैनंदिन उदरनिर्वाहाचा मुख्य आधार बनला आहे. सध्या बाजारात १०० काजूच्या बियांना २०० ते ३५० रुपये असा दर मिळत आहे. आकारमानानुसार हा दर बदलतो. जूनपर्यंत हा छोटासा पण महत्त्वाचा व्यवसाय बहरात असतो. विशेष म्हणजे मुंबई,ठाणे,पुणे आणि संपूर्ण कोकणातून येणारे पर्यटक आणि प्रवासी माणगाव येथे थांबून आवर्जून हा रानमेवा खरेदी करत आहेत.

या आदिवासी महिला भगिनी महामार्गाच्या कडेला उन्हात बसून विक्री करतात. त्यांच्या चेहऱ्यावर थकवा असला तरी डोळ्यांत आशेची चमक दिसते. काजूच्या बिया गोळा करताना त्यांना घनदाट जंगलात जावे लागते. वाघ,बिबट्या,रानडुक्कर यांसारख्या हिंस्र प्राण्यांचा धोका कायम डोळ्यासमोर असतो. काजूच्या बियांचे कवच काढताना हातांची कातडी सोलली जाते,बोटांना जखमा होतात. या प्रक्रियेमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. तरीही कुटुंबाच्या पोटासाठी त्या न डगमगता काम करत राहतात.

या हंगामात काजूच्या बियांबरोबरच गावरान करवंदे, जांभळे, आंबे, कैऱ्या आणि विविध रानभाज्या उपलब्ध आहेत. हा रानमेवा केवळ चविष्टच नाही,तर आरोग्यदायीही आहे. रासायनिक प्रक्रियेपासून दूर असलेला हा अस्सल निसर्गदत्त आहार शहरातील नागरिकांना आकर्षित करीत आहे.

# कळंबोलीत होळी, धुळवड जल्लोषात

## अबालवृद्धांकडून आनंदाची उधळण

**कळंबोली : बातमीदार**

जागतिक स्तरावर जरी युद्धाचे सावट असले तरी त्याला जुमानता पनवेलसह कळंबोलीमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा रंगीबेरंगी पाण्याचा फुग्यांचा मारा करून बच्चे कंपनी सह तरुणाईने मोठा आनंद लुटला. कळंबोली वसाहतीमध्ये शेकडो होळ्या पेटवण्यात आल्या. धुळवटीच्या दिवशी सकाळपासूनच प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये रंगीबेरंगी पाणी भरून त्याची जोरदार आतषबाजी तरुणाईमध्ये पाहायला मिळाली.



एकीकडे धुळवळीचा सण साजरा करीत असताना मात्र मांसाहार करणाऱ्या खवय्यांना मात्र अचानक वाढलेल्या मटणाच्या भाव वाढीला सामोरे जावे लागले. तब्बल साठ रुपये किलोमागे वाढवल्याने ९०० रुपये किलोने मटण मांसाहार ग्रहण करणाऱ्या खवय्यांना खरेदी करावे लागले त्यामुळे त्याचाही संताप नागरिकांनी व्यक्त केला.

कळंबोलीमध्ये विविध हाऊसिंग सोसायटी मधून पारंपारिक पद्धतीने नुसार होलिका उत्सव मोठ्या धुमधडाक्यात आणि उत्साहाच्या वातावरणामध्ये साजरा करण्यात आला. पारंपारिक पद्धतीने नाच गाण्याच्या तालावर होळी पेटवुन आणि रंगाची उधळण करून मोठ्या भक्ती भावाने आनंद साजरा करण्यात आला. मंगळवारी धुलीवंदनाच्या दिवशी सकाळपासूनच बच्चे कंपनीसह तरुणाईने हातामध्ये शेकडो पिशव्यांमध्ये रंगीबेरंगी पाणी भरून त्याचे फुगे बनवून एका सोसायटीमधून दुसऱ्या सोसायटीमध्ये रंगीबेरंगी पाण्याच्या मारा करून एक प्रकारे युद्धजन्य परिस्थिती निर्माण केलेली दिसून आली. जागतिक स्तरावर जरी युद्धाचे सावट असले तरी कळंबोली मध्ये रंगीबेरंगी पाण्याने भरलेले प्लास्टिकचे फुगे एकमेकांवर मारून तरुणाईने आपला आनंद साजरा केला.

यामुळे विविध प्रकारचे रंग उडवणाऱ्या विविध आकाराच्या चिनी बनावटीच्या पिचकारीनी यावर्षीही आपली बाजारपेठ काबीज केल्याचे एकंदरीत दिसून आले. विविध प्रकारच्या आकाराच्या पिचकार्यांनी बच्चे कंपनीचे लक्ष वेधून घेण्यात आले होते. दीडशे रुपयांपासून ते सातशे रुपये पर्यंतच्या पिचकार्या या बाजारामध्ये विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. गतवर्षीपेक्षा यावर्षी पंधरा ते वीस टक्के भाव वाढ ही विविध प्रकारचे रंग आणि विविध प्रकारच्या पिचकार्यांमध्ये झाल्याचे कळंबोलीतील दुकानदार सागर ठोंबरे यांनी सांगितले आहे. तरीही महागाईला न जुमानता नागरिकांनी आपला सण मोठ्या धुमधडाक्यात आणि उत्साहात साजरा केल्याच एकंदरीत दिसून आले.

धुळवडीला जे नागरिक मांसाहार करतात त्यांना धुळवडीच्या दिवशी अचानक वाढलेल्या मटणाच्या भाव वाढीला सामोरे जावे लागले. ८४० रुपये प्रती किलो असणारे मटण अचानक साठ रुपयाची वाढ केल्याने ९०० रुपये प्रति किलोने नागरिकांना खरेदी करावे लागले.त्यामुळे मांसाहार खवय्याने धुळवडीच्या दिवशी संताप व्यक्त केल्याचे दिसून आले.

बोकडाच्या मटणाचे अचानक वाढवलेल्या भाव वाढीचे कोणतेही कारण मात्र विक्रेत्यांनी सांगितले नाही त्यामुळे मूग गिळून गप्प बसून अधिक दराने मटन खरेदी करण्याची वेळ ही खवय्यांवर धुळवडीच्या दिवशी आली होती.

कळंबोलीमध्ये शेकडो बोकडांची कत्तल व हजारो कोंबड्या कळंबोलीकरांनी फस्त केल्याचे समजते. धुळवडीच्या दिवशी ड्राय डे नसल्याकारणाने दुपारनंतर सर्वच देशी विदेशी दारू विक्रीचे बार हे हाऊसफुलच दिसून आले.

उत्तर भारतीय बिहारी लोक धुळवड आगळावेगळ्या पद्धतीने साजरी करीत असतात. या दिवशी थंडाई ही मोठ्या प्रमाणावर केली जाते, परंतु चंद्रग्रहणाचे वेध लागल्या कारणाने यावर्षी थंडाई पिणाऱ्यांच्या आनंदात एक प्रकारे ग्रहणच लागल्याचे काहींनी सांगितले.

धुळवडीला थंडाई शेकडो लिटर ही कळंबोलीमध्ये विविध ठिकाणी केली जाते.त्याचा आस्वाद हजारो थंडाई प्रेमी दरवर्षी घेतात. पण यावर्षी ग्रहण असल्याकारणाने भांगे पासून बनवलेली थंडाई नसल्याचे सांगण्यात आले.

# महेश बालदी मित्र मंडळातर्फे धुळवड उत्साहात



**उरण : वार्ताहर**

होळी व धुळवड उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. होळी उत्सव व दुसऱ्या दिवशी धुळवडकार्यकम मोठ्या उत्साहात साजरा केले

सालाबादप्रमाणे यंदाही महेश बालदी मित्र मंडळाच्या वतीने उरण शहरातील स्वामी विवेकानंद चौक येथे धुळवड कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी आमदार महेश बालदी उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमात उरण शहरातील नागरिक, मित्र परिवार यांनी एकत्र धुळवड सण साजरा केला. एकमेकांना नैसर्गिक रंग लावून आपला सण साजरा केला.

या वेळी माजी नगरसेवक तथा उरण शहर भाजप अध्यक्ष कौशिक शाह, सुनील पेडणेकर, चंद्रहास घरत, नितीन पाटील, परेश तेरडे, संतोष ओटवकर, निलेश कदम, सचिन वैद्य, योगेश वैवडे, जितू पटेल, रवी कुलकर्णी, दिनेश ठक्कर सुरेश घोसाळकर, संतोष साळवी, शैलेश पोतदार, अनिल दाते, शैलेश समेळ, ब्लेस कोळी, कुणाल समेळ, जितु पटेल, पंकज समेळ, सुर्यकांत कोळी, कुणाल सिसोदिया, कुणाल समेळ, पुरोषोत्तम सेवक मकरंद पोतदार आदी उपस्थित होते. सर्वांनी आनंद व्यक्त केला.



**पनवेल : शिरढोण येथे होळी सण साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य मंगेश वाकडीकर यांनी रंगांची उधळण करून धुलिवंदनाचा आनंद सर्वांबरोबर घेतला.**



**पनवेल : तारा येथे होळी सण पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष विद्याधर जोशी आणि पनवेल पंचायत समिती सदस्य मयुर शेलार उपस्थित होते.**



**पनवेल : दिघाटी येथे होळी पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. त्यानंतर सर्वांनी रंगांची उधळण करुन धुलिवंदनाचा आनंद साजरा केला.**

# जासई हुतात्मा स्मारकाचे डिसेंबर २०२६पर्यंत काम पूर्ण होणार

## सिडकोकडून सात कोटींचा निधी

**उरण : बातमीदार**

देशातील शेतकऱ्यांच्या जमिनीला दर आणि हक्क मिळवून देणाऱ्या १९८४च्या शेतकरी आंदोलनातील हुतात्म्यांच्या स्मारकाच्या कामाला गती मिळणार आहे.भव्य दिव्य असे स्मारक 'दिबां'च्या जन्मगावी उरण तालुक्यातील जासई येथे सिडकोकडून उभारण्यात येत आहे. यासाठी सिडकोने सात कोटींचा निधी मंजूर केला आहे.

उरण तालुक्यातील जासई येथील या हुतात्मा स्मारकाच्या कामाला सुरुवात झाली असून येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत हे स्मारक पूर्ण केले जाणार असल्याचे सिडकोकडून सांगण्यात आले आहे.

नवी मुंबईच्या उभारणीसाठी ठाणे व रायगड जिल्ह्यातील अनेक हुतात्म्यांचे योगदान आहे.१९८४ ला दास्तान व नवघर फाटा या दोन ठिकाणी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एकूण पाच शेतकऱ्यांनी हौतात्म्य पत्करले. यात दास्तान येथे नामदेव घरत व रघुनाथ ठाकूर तर नवघर फाटा येथे कमलाकर तांडेल आणि महादेव हिरा पाटील व केशव महादेव पाटील या पिता-पुत्रांचा समावेश आहे.या हुतात्म्यांचे स्मारक बांधण्यात येत असून सिडकोने दिलेल्या आर्थिक सहयोगामुळे या कामाला गती मिळाली आहे.स्मारक झाल्याने खऱ्या अर्थाने उरण मधील हुतात्म्यांना न्याय मिळणार आहे. त्यांच्या विचारांचे समरण कार्याचे जतन स्मारकच्या माध्यमातून जगासमोर येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सुद्धा समाधान व्यक्त केले आहे.

> **जासई येथील स्मारकाचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचा मानस आहे. हे स्मारक दुमजली असून यामध्ये प्रशिक्षण, बहुउद्देशी, प्रदर्शन सभागृह, लहान मुलांसाठी खेळण्याची व्यवस्था, वाचनालय तसेच कार्यालय आदींचा समावेश आहे.**
>
> **– राजीव कोळप, कार्यकारी अभियंता, द्रोणागिरी नोड**

# श्रीसदस्यांनी राबवली स्वच्छता मोहीम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे समितीतील श्रीसदस्यांनी पनवेल तालुक्यातील चिंद्रण, आंबे, शिरवली, मोहोदर, कुत्तरपाडा, माहाळुगी, चिरड,पाली उसाठणे,बुर्दुळ,कुंभारली नितळस, वळण, पालेबुद्रुक, नेवाळी. आदी २६ गावामध्ये स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये १३५७ सदस्यांनी भाग घेऊन ४१००किलो ओला कचरा व २३०० किलो सुका कचरा गोळा करण्यात आला.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त ठीक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या उपक्रमात तब्बल १३५७ स्वयंसेवकांनी सहभाग घेत अनेक ठिकाणचा परिसर स्वच्छ केला. शासकीय रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पोलीस चौकी, स्मशानभूमी परिसराची यावेळी स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेदरम्यान ६४०० किलो कचरा गोळा करण्यात आला. यावेळी गावांचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, डॉक्टर, स्थनिक नागरिक, महिला यांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे गेली अनेक वर्ष रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, आपत्तीग्रस्तांना मदत अशा विविध उपक्रमातून समाज हिताचे कार्य सातत्याने केले जात आहे.

# संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे राष्ट्रीय महिला दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतामध्ये १३ फेब्रुवारी हा दिवस सरोजिनी नायडू यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या वर्षापासून संवेदना चॅरिटेबल संस्थेने हा दिवस साजरा करण्याचे ठरवले दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेने राष्ट्रीय महिलादिन साजरा करून समाजात वेगळा पयंडा पडण्याचा एक छोटासा प्रयत्न केला. यावेळी ' तू तेव्हा तशी 'या थीमवर राष्ट्रीय महिला दिन अत्यंत अर्थपूर्ण, प्रेरणादायी आणि समाजजागृती करणाऱ्या पद्धतीने साजरा केला गेला. तू तेव्हा तशी आजही तशीच उद्याही तशीच सक्षम! स्त्रीच्या बदलत्या भूमिका – ही थीम स्त्रीचा प्रवास – काल, आज आणि उद्या



दाखवणारा असा होता. वेदकालीन काळातील विदुषी लोपामुद्रा पासून ते आजच्या आधुनिक युगातील आत्मनिर्भर स्त्रीपर्यंतचा हा प्रवास म्हणजे तू तेव्हा तशी आजही तशीच! प्रत्येक सखीने तिचा अभिनय अगदी कसं लावून केला होता. प्रेक्षक भारावून गेले होते त्याच्या डोळ्यातील पाणी हाच त्या कार्यक्रमाचा आत्मा होता. एवढा हा विषय प्रत्येक जमलेल्या स्त्रीच्या मनाला भिडला.

यावेळी गेले अनेक वर्ष संस्थेतून चालणाऱ्या वेगवेगळ्या समजिक तसेच संस्कृतिक उपक्रमात आपला जास्तीत जास्त वेळ दिलेल्या स्त्रियांना सन्मानित केले जाते. संवेदना संस्थेतर्फे वेगवेगळे मानाचे पुरस्कार संवेदना सखीला देऊन तिचा सन्मान केला जातो. या वेळी मिसेस संवेदना २०२६ हा मानाचा किताब अनघा भातणकर हिला मिळाला. तर स्त्री शक्ती पुरस्कार अरुणा लाडे हिला देऊन गौरवण्यात आले. संस्थेने चालू केलेल्या सुका कचरा वर्गिकरण या चळवळीस अनेक संवेदना सख्या हातभार लावत असतात. यामध्ये अनेक महिला आपला वेळ या कामासाठी देतं असतात. त्यांनाही हरित योद्धा हा पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. या वर्षीचा हा पुरस्कार श्रीमती प्रिया बने हिला देण्यात आले. तसेच यात सक्रिय सहभाग असलेल्या महिलांना प्रशस्तिपत्रक आणि ज्ञानभेट म्हणून पुस्तक भेट देऊन गौरवण्यात आले. संस्थेच्या कार्यक्रमात आमंत्रित मान्यवर श्रीमती कविता ठाकुर आणि श्रीमती रेश्मा कृरूप या दोन स्त्री-शक्तींचा यावेळी तुळशीचे रोप, सन्मानचिन्ह आणि ज्ञानभेट म्हणून पुस्तक देऊन गौरवण्यात आले. त्यांची उपस्थितीही खूप प्रेरणादायी ठरली. हा महिलादिन साजरा करण्याचा उद्देश सांगताना संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी सांगितले कि, जागतिक महिलादिन हा सार्वत्रिक साजरा करून समानतेचा संदेश देतो. परंतु राष्ट्रीय महिला दिन आपल्या देशातील स्त्रीशक्तीच्या विशिष्ट योगदानाचा अभिमान जागवणारा आणि प्रेरणा देणारा अधिक आत्मीय उत्सव आहे.

# नऊ महिन्यांची गरोदर, तरीही जनतेसाठी जि.प. सदस्य हर्षदा घरत 'ॲक्शन मोड'वर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पळस्पे डी-मार्टसमोरील खड्ड्यांनी ठप्प झालेल्या रस्तामुळे अपघातांना आमंत्रण मिळत आहे.सिस्टम हलत नाही तोवर जनता रडत राहते,पण नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या हर्षदा अतुल घरत यांनी हे समीकरणच मोडून काढले. चक्क नवव्या महिन्याअखेर गरोदरपणात रायगड जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्या हर्षदा अतुल घरत यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी थेट रस्त्यावर उतरल्या आणि प्रशासनाला कामाला लावले.

पळस्पे परिसरात डी मार्ट समोर रस्ता खचून प्रचंड खड्डे पडले आहेत. वाहतूक ठप्प, नागरिक त्रस्त,



अपघातांचा धोका वाढलेला असताना अनेकांनी तक्रारी केल्या, मात्र हालचाल शून्य!

अशा वेळी 'आज करू उद्या पाहू' म्हणत मागे न हटता जिल्हा परिषद सदस्या हर्षदा अतुल घरत यांनी थेट घटनास्थळी हजेरी लावली. रात्री उशिरापर्यंत स्वतः उभ्या राहून कामावर लक्ष ठेवत त्यांनी रस्त्याची दुरुस्ती पूर्ण करून घेतली. त्यांच्या पाठीशी अतुल घरत खंबीरपणे उभे राहिले.

ही घटना फक्त खड्डे बुजवण्याची नाही.ही निष्क्रिय यंत्रणेला दिलेली ठोस झणझणीत चपराक आहे.

आरामात बसून निवेदनं देणाऱ्यांसाठी हा थेट संदेश जनतेचा प्रश्न असेल तर रस्त्यावर उतरा, नाहीतर बाजूला व्हा.

जनतेसाठी झुंजणारे नेतृत्व म्हणजे हर्षदा अतुल घरत कृतीतून विश्वास निर्माण करणारे नाव आज जिल्हा परिषद सदस्यांच्या रूपाने पाहायला मिळत असल्याची प्रवासी व नागरिकांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# नवी मुंबई पोलिसांकडून १८ कोटी ६३ लाख रुपयांचे अमली पदार्थ नष्ट

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नशा मुक्त नवी मुंबई अभियानांतर्गत अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या कारवाईचा पुढील टप्पा म्हणून नवी मुंबई पोलिसांनी होळीच्या मुहूर्तावर १८ कोटी ६३ लाख ३४ हजार २६६ रुपयांच्या किमतीचे अमली पदार्थ नष्ट केले. हे अमली पदार्थ ५५ वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आले होते. तळोजा येथील शासनमान्य मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी येथे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांचा नाश करण्यात आला.

मागील तीन वर्षांत बेकायदेशीररित्या वास्तव्य करून ड्रग्ज विक्री करणाऱ्या आफ्रिकन नागरिकांविरुद्ध विशेष मोहीम राबवण्यात आली. यात १५२२ जणांना हद्दपार करण्यात आले असून १११ जणांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे. तसेच अमली पदार्थ विक्रीत सक्रिय सहभाग आढळलेल्या आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे.

पंजाब राज्यातून नवी मुंबईत येऊन हॉटेल, लॉज व पीजीमध्ये राहून ट्रक आणि रेल्वेमार्गे अमली पदार्थांची वाहतूक करून विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला. या प्रकरणात १६ गुन्हे दाखल करून ३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून ४ कोटी २० लाख ७० हजार रुपयांच्या किमतीचे हेरॉईन, अफू, मेफेड्रोन आणि कोडीन बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. मुख्य सूत्रधार आरोपीला पंजाब राज्यातून अटक करण्यात आली.



# एसटी स्टॅण्ड परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल** : पनवेल एस.टी.स्टॅण्ड परिसरातील मेडीसिटी केमिस्ट मेडीकलच्या बाजूला एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्षे, रंग सावळा, बांधा मध्यम, उंची अंदाजे ५ फुट ५ इंच, चेहरा उभट, अंगाने मध्यम, डोक्यावरील केस काळे व पांढरे, दाढी मिशीचे केस वाढलेले असून, अंगात चॉकलेटी रंगाचा मळकट टी-शर्ट, त्यावर काही पांढरे पट्टे आहेत व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी ८६५५३५४१११ किंवा तपास अधिकारी सपोनि सचिन पोवार मो.नं.७०२१०२७१०० यांच्याशी संपर्क साधावा.

## संपादकीय

# भारतासाठी दुहेरी संकट

इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे जागतिक व्यापारावर परिणाम झाला असून भारताची व्यापार आणि ऊर्जा पुरवठा साखळी मोठ्या प्रमाणात याच भागातून जाते. त्यामुळे या युद्धातून भारतासमोरही दुहेरी संकट उभे राहू शकते असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. भारताच्या आयातीसमोर यातून मोठी आव्हाने उभी राहू शकतात. इंधन महागल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची भीतीही आहेच. हा संघर्ष लांबल्यास या परिणामांची तीव्रता आणखी विकोपाला जाईल.

**इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाचा तडाखा मध्यपूर्वेतील देशांमध्ये मोठ्या संख्येने असलेल्या भारतीयांना बसला आहे. या संघर्षग्रस्त भागातील विमानसेवा काही काळ पूर्णपणे खंडित झाल्यामुळे तेथील भारतीयांना परत आणण्यात अडचणी निर्माण झाल्या. अजुनही विमानसेवा काहीशी विस्कळीतच असली तरी एव्हाना भारतीयांचे काही गट सुखरूप मायदेशी परतले आहेत. इराणमध्ये अजुनही सुमारे हजार-बाराशे भारतीय विद्यार्थी अडकले असून त्यांना सुरक्षित बाहेर काढून रस्तामार्गे शेजारच्या देशांमध्ये पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आखाती देशांच्या नेत्यांशी चर्चा करून सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत तेथील एक कोटी भारतीयांच्या सुरक्षेला आपण सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याचे सांगितले आहे. या कठीण काळात भारत आपल्या तेथे असलेल्या जनतेसोबत ठामपणे उभा असल्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच आखाती देशांमध्ये झालेल्या हल्ल्यांचा तीव्र निषेधही केला. जॉर्डनच्या पंतप्रधानांशीही मोदींनी चर्चा केली. या प्रदेशात शक्य तितक्या लवकर शांतता आणि स्थैर्य परतण्याची गरज आहे असे मत मोदींनी व्यक्त केले. दुबईमध्ये अनेक भारतीय पर्यटकांनी अगदी जवळून स्फोटांचा अनुभव घेतला. यापैकी महाराष्ट्रातील पर्यटकांचा एक गट विमानसेवा सुरू होताच सुखरूप कोल्हापूरला परतला आहे. इराण हा कच्च्या तेलाचा प्रमुख उत्पादक देश आहे. भारताला होणाऱ्या तेलपुरवठ्यापैकी ५० टक्के पुरवठा हा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होतो. रशियाकडून तेलखरेदी थांबवण्यासाठी अमेरिकेकडून वाढता दबाव आल्यानंतर भारताने इराण आणि अन्य आखाती देशांकडून तेलआयात वाढवली. पण इराणने आता होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. बंडखोरांकडून लाल समुद्र आणि होर्मुझची सामुद्रधुनी या दोन्ही तेलवाहतूक मार्गांना लक्ष्य करण्याचा धोकाही आहे. या साऱ्याचा भारताच्या तेलपुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. हे युद्ध सुरू होताच तेल महागले व रुपयाही कमकुवत झाला. कच्च्या तेलाच्या किंमतीतील वाढ आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाचे होणारे अवमूल्यन या दुहेरी संकटामुळे युद्धाच्या पहिल्या चार दिवसांतच भारतावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडला आहे. सोबतच या युद्धामुळे समुद्री आणि हवाई मार्गावरील अनिश्चिततेमुळे मालवाहतूक विस्कळीत झाली आहे. भारताच्या कृषी निर्यातीसमोरही संकट उभे राहिले आहे. इराण आणि इराकला होणारी बासमती तांदळाची निर्यात पूर्णपणे ठप्प झाली आहे. इराण आणि इराक या भारतीय बासमती तांदळाच्या प्रमुख बाजारपेठा आहेत. भारताच्या एकूण बासमती निर्यातीपैकी इराणचा वाटा २५ टक्के तर इराकचा २० टक्के आहे. भारतीय चहाच्या निर्यातीलाही युद्धाचा फटका बसणार आहे. भारताकडे आज 'ग्लोबल साऊथ'चा म्हणजेच विकसनशील देशांचा नेता म्हणून पाहिले जाते. जागतिक पातळीवर आज दिसणाऱ्या या टोकाच्या अस्थिरतेत कुठल्याही एका बाजूने उभे राहणे मोठे आव्हानात्मकच ठरते. हे युद्ध दीर्घकाळ चालल्यास भारताच्या व्यापारी संबंधांसह भारतीय अर्थव्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम संभवतील अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते आहे.**

# राष्ट्रीय सुरक्षा दिवस : इतिहास, उद्देश आणि महत्त्व



राष्ट्रीय सुरक्षा दिवस (नॅशनल सेफ्टी डे) भारतात प्रत्येक वर्षी ४ मार्च रोजी पाळला जातो. हा दिवस साजरा करण्याचा मुख्य हेतू म्हणजे आपल्या जीवनातील विविध वेळी जागरूकता नसणे किंवा लक्ष न दिल्यामुळे होणारे अपघात रोखणे. पूर्वी साजरा केलेला राष्ट्रीय सुरक्षा दिन आता राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह म्हणून साजरा केला जात आहे. या आठवड्यात, विविध जागरूकता कार्यक्रमांद्वारे औद्योगिक अपघात टाळण्यासाठीच्या पर्यायांवर लोकांना जागरूक केले जाते. या संपूर्ण आठवड्यात केल्या गेलेल्या प्रत्येक कार्याचा एकमात्र उद्देश म्हणजे लोकांना त्यांच्या सुरक्षिततेबद्दल जागरूक करणे आणि त्यांना संरक्षणाच्या विविध मार्गांबद्दल जागरूक करणे.

राष्ट्रीय सुरक्षा दिन हा देशाच्या सुरक्षा विभागात आणि देशाला सुरक्षा देणारे सर्व सैनिक यांच्यासाठी विशेष रूपाने साजरा केला जातो. या सर्वांमुळे देशाच्या सीमांचे रक्षण होते आणि या कारणास्तव शांतता आणि देशात सुरक्षेची भावना निर्माण होते. या दिवशी आपण सर्वजण, देशवासीय या सर्व सुरक्षा दलांना मनापासून अभिवादन करतो.

हा दिवस अस्तित्वात आणण्याचा उपक्रम नॅशनल सेफ्टी कौन्सिल तर्फेच करण्यात आला. ४ मार्च रोजी भारतात नॅशनल सेफ्टी कौन्सिलची स्थापना झाली म्हणून हा दिवस राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणून साजरा केला जातो. नॅशनल सेफ्टी कौन्सिल ही एक स्वायत्त संस्था आहे, जी सार्वजनिक सेवेसाठी अशासकीय आणि नफा न घेणार्या संस्थेच्या रूपात काम करते. या संघटनेची स्थापना १९६६मध्ये मुंबई सोसायटी अ‍ॅक्ट अंतर्गत करण्यात आली होती, ज्यात आठ हजार सदस्य होते. यानंतर १९७२मध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि यानंतर लवकरच हे राष्ट्रीय सुरक्षा दिनाऐवजी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह म्हणून साजरे करण्यास सुरवात झाली.

हा दिवस त्या सर्व बलिदान करणार्यांना समर्पित आहे, ज्यांनी आपले रक्त वाहवून देशाचे रक्षण केले. या दिवशी हिंदुस्थान त्यांच्या धैर्य आणि उत्कटतेला सलाम करतो. आपल्या हृद्यात स्थान असणाऱ्या अशा शहिदांच्या शहादलाला कुणी शब्दांत कसे सांगू शकेल. हा दिवस प्रथमच ४ मार्च १९६६ रोजी साजरा करण्यात आला, ज्यामध्ये आठ हजार सदस्यांनी हजेरी लावली होती, त्यावेळी हा दिवस देशातील लोकांना सुरक्षिततेकडे जागृत करण्याच्या उद्देशाने साजरा केला गेला होता. त्यात देशात, समाजात कशा प्रकारे एकमेकांची सुरक्षा लक्षात घेता कार्य करावे, त्या दिशेने प्रवृत्त केले गेले.

देशाचे संरक्षण केवळ शत्रूपासून संरक्षण नव्हे तर आजारांपासून लोकांना सुरक्षित ठेवणे देखील आहे. राष्ट्रीय सुरक्षा दिवस प्रत्येकाला या दिशेने पाऊल टाकण्याचा मार्ग दर्शवितो. देश स्वच्छ ठेवणे देखील सुरक्षेच्या अंतर्गत येतं. ज्यामध्ये सरकार आणि जनता तसेच उद्योगपती जबाबदार आहेत आणि या सर्वांनी एकत्रितपणे देशात स्वच्छता संबंधित सुरक्षा आणणे आवश्यक आहे, अशा प्रकारे स्वच्छतादेखील सुरक्षा दिनाचे उद्दिष्ट आहे. अन्न: आजच्या काळात भेसळयुक्त वस्तूंचे प्राबल्य अधिक आहे, यामुळे बऱ्याच रोगांनाही कारणीभूत ठरत आहे आणि ही नवीन जनरेशन यामुळे कमकुवत होत आहे, देशाचे अधिक संरक्षण करणे आपले कर्तव्य आहे. हा सुरक्षेचादेखील एक भाग आहे. देशातील गरिबांची संख्याही खूप जास्त आहे, यामुळे ते असुरक्षित आहेत. त्यांच्यासाठीही विचार करणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. गरिबांना भुकेमुळे मरण्याची वेळ येऊ नये आणि त्यांना जगण्यासाठी काही साधन मिळू शकेल याची काळजी घेतली पाहिजे. हासुद्धा सुरक्षेचा एक भाग आहे. नारी सुरक्षा याबद्दल सर्वांना मिळून कार्य करणे आवश्यक आहे. एखादी घटना घडल्यानंतर शिक्षा देणे न्यायालयाचे काम आहे परंतु या घटनांचा अंत करण्यासाठी आपण सर्वांनी विचार करणे व कार्य करणे आवश्यक आहे. तरच राष्ट्रीय सुरक्षा दिवस या सारखा दिन प्रभावी सिद्ध होईल. असे अनेक समस्या आणि विषयांवर राष्ट्रीय सुरक्षा दिनाच्या निमित्ताने कार्य केले पाहिजे, जेणेकरून देशात सुरक्षित वातावरण निर्माण होऊ शकेल.

राष्ट्रीय सुरक्षा दिवस संपूर्ण देशात साजरा केला जातो. हा उत्सव साजरा करण्याचे मुख्य उद्दिष्ट सुरक्षिततेसह आरोग्य आणि पर्यावरणाशी संबंधित विविध हालचालींविषयी लोकांना जागरूक करणे आहे. हा उत्सव साजरा करण्याचा आणखी एक उद्देश म्हणजे सुरक्षिततेसाठी विविध औद्योगिक क्षेत्रात लोकसहभागास प्रोत्साहित करणे. वेगवेगळ्या व्यवसाय मालकांद्वारे त्यांच्या कर्मचार्यांना विविध सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरणाशी संबंधित क्रियाकलापांमध्ये गुंतवून सहभागी करून घेण्याच्या दृष्टिकोनास प्रोत्साहित करणे. या मोहिमेद्वारे, गरजांवर आधारित क्रियाकलाप, कायदेशीर आवश्यकतांसह आत्म-तपासणी आणि कामाच्या ठिकाणी अधिकृत आरोग्य सुरक्षा आणि वातावरणाशी संबंधित क्रियाकलापांना पार पाडणे. मालक आणि कर्मचार्यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदारीची आठवण करून देऊन कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण निर्मित करणे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सावधगिरीच्या प्रवृत्तीसह सुरक्षिततेस प्रोत्साहित करणे.

(साभार : इंटरनेट)

# भारतीय टेनिस खेळाडू रोहन बोपण्णा

रोहन बोपण्णा हा भारतातील एक व्यावसायिक टेनिस खेळाडू आहे. त्याचा आज वाढदिवस. तो दुहेरीसाठी सर्वात जास्त ओळखला जातो, जिथे दोन खेळाडू एकमेकांविरुद्ध एकत्र स्पर्धा करतात. २०२४च्या ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस चॅम्पियनशिपमध्ये रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन या जोडीने ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष दुहेरीचे विजेतेपद जिंकले आहे. ४३ वर्षांच्या वयात बोपण्णाचे हे पहिलेच ग्रँड स्लॅम जेतेपद आहे. बोपण्णाने ग्रँड स्लॅम जेतेपद जिंकणारा सर्वात वयस्कर टेनिस खेळाडू म्हणून उदयास आला आहे.

रोहन बोपण्णाचा जन्म ४ मार्च १९८० रोजी भारतातील बंगळुरू येथे झाला. लहानपणी त्याला खेळाची आवड होती आणि टेनिसने त्याला आकर्षित केले. मोठा होत असताना तो सक्रियपणे सहभागी झाला. टेनिसबद्दलच्या त्याच्या आवडीमुळे त्याला ते गांभीर्याने घेण्याची प्रेरणा मिळाली आणि त्याने स्पर्धा खेळायला सुरुवात केली.



रोहन बोपण्णाने आपले शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण बंगळुरू येथून पूर्ण केले, त्याला टेनिस खेळण्याची आवड होती, ज्याचा तो अभ्यासासोबत सराव करत होता आणि तो एक यशस्वी टेनिसपटू बनला.

रोहन विम्बल्डन, यूएस ओपन, फ्रेंच ओपन आणि ऑस्ट्रेलियन ओपन सारख्या ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये खेळला आहे. २०१०च्या यूएस ओपनच्या मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत त्याने ऐसाम-उल-हक कुरेशीसोबत भागीदारी केली होती. बोपण्णाने वेगवेगळ्या भागीदारांसह दोन एटीपी (असोसिएशन ऑफ टेनिस प्रोफेशनल्स) स्पर्धा देखील जिंकल्या आहेत. रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एब्डेन या जोडीने २०२४मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष दुहेरीचे विजेतेपद जिंकले आहे. बोपण्णाचे हे पहिलेच ग्रँड स्लॅम विजेतेपद आहे. बोपण्णा ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकणारा सर्वात वयस्कर टेनिस खेळाडू म्हणून उदयास आला आहे.

रोहन बोपण्णा याचे २०१२मध्ये सुप्रिया अन्नायाशी लग्न झाले. रोहन आणि सुप्रियाला एक मुलगा आहे.

(साभार : इंटरनेट)




# शालेय विद्यार्थ्यांसाठी एआयचे अनेक फायदे

एआय म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स. आजच्या डिजिटल युगातील एक क्रांतिकारी तंत्रज्ञान आहे.



शालेय शिक्षणामध्ये एआय हे एक शक्तिशाली साधन म्हणून उदयास आले आहे, जे शिक्षण प्रक्रियेला अधिक प्रभावी, रोचक आणि वैयक्तिक बनवते. पारंपरिक शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांना एकसारखा अभ्यासक्रम आणि शिकवण्याची पद्धत मिळते, पण एआय या मर्यादा पार करून प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजा आणि क्षमतांनुसार शिक्षण प्रदान करते. या लेखात पाहूया की एआय शालेय विद्यार्थ्यांसाठी कसे फायदेशीर ठरते, त्याचे विविध पैलू आणि उदाहरणे.

सर्वप्रथम, एआय वैयक्तिकृत शिक्षण प्रदान करून विद्यार्थ्यांच्या गतीनुसार शिकवते. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती वेगळी असते. काहींना गणित पटकन समजते, तर काहींना भाषा विषयात अडचण येते. एआय आधारित ॲप्स विद्यार्थ्यांच्या उत्तरांचा अभ्यास करतात आणि त्यानुसार अभ्यास सामग्री सुचवतात. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी गुणाकारात कमकुवत असेल तर एआय त्याला त्यावर अधिक सराव देऊन हळूहळू कठीण स्तरांपर्यंत नेतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि अभ्यास अधिक परिणामकारक होतो. संशोधनानुसार एआय आधारित वैयक्तिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रगती ३० टक्के अधिक असते.

दुसरे म्हणजे, एआय विद्यार्थ्यांना २४७ उपलब्ध असणारे ट्यूटर म्हणून काम करते. शालेय वेळेनंतर किंवा सुट्टीत अभ्यास करताना अडचण आली तर एआय चॅटबॉट्स जसे की ChatGPT किंवा Google Bard ३६५ दिवस, २४ तास मदतीसाठी उपलब्ध असतात. ते उदाहरणांसह स्पष्टीकरण देतात आणि अगदी होमवर्कमध्येही मदत करतात. याचा फायदा विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होतो, ज्यांना दर्जेदार शिकवणीची कमतरता असते. एआय भाषा अनुवाद करून मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना इंग्रजी किंवा इतर भाषांतील सामग्री समजावून सांगते, ज्यामुळे जागतिक ज्ञानाची दारे खुली होतात. शेवटी एआय शालेय विद्यार्थ्यांसाठी एक वरदान आहे जे शिक्षणाला अधिक प्रभावी आणि समावेशक बनवते. भविष्यात एआय शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग बनेल आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल.

# लेखक प्रा. पुरुषोत्तम सहस्रबुद्धे

प्राध्यापक पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे हे लेखक आणि मराठी विषयात पीएचडी मिळविणारे पहिले अभ्यासक होते. हिंदू धार्मिक परंपरा आणि सनातनांवर त्यांनी टीका केली.

पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे मराठीचे प्राध्यापक होते. समाजात ते विद्वान म्हणून ओळखले जात होते. लेखक म्हणून त्यांनी शैक्षणिक संशोधनांपासून काल्पनिक लेखनापर्यंत विविध साहित्यप्रकार हाताळले आहेत. त्यांचा जन्म १० जुन १९०४ साली पुण्यात झाला. त्यांनी सुरुवातीचे शिक्षण पुण्यातच, तर नंतरचे शिक्षण मुंबई विद्यापीठातून घेतले. सहस्रबुद्धे यांच्या सुरुवातीच्या काळातील, तसेच जडणघडणीच्या वयातील फारशी माहिती उपलब्ध नाही; तरीही त्यांची कारकीर्द आणि त्यांना लाभलेले सार्वजनिक मानसन्मान यांच्या नोंदी मात्र आहेत. त्यांच्याकडून शिकलेल्यांची तसेच त्यांच्या समकालीन लोकांची प्रशंसापत्रेही आहेत. त्यांचे पुत्र सुहास सहस्रबुद्धे यांनी हा माहितीचा ठेवा सर्वांसाठी खुला ठेवला आहे.

मराठी विषयात पीएचडी प्राप्त करणारे ते पहिलेच तज्ज्ञ होते, असे समजले जाते. ते उत्तम शिक्षक म्हणून ओळखले जात. त्यांनी १९२८ ते १९४३ या काळात पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात शिकविण्याचे काम केले, तर १९४३-१९६४ या काळात



## निमित्त

पुण्याच्या परशुरामभाऊ महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये आणि साहित्य वर्तुळात ते डॉक्टर या नावाने परिचित होते. मुंबई विद्यापीठातून त्यांनी डॉक्टरेट पदवी संपादन केल्याने त्यांना तसे म्हटले जाई. सहस्रबुद्धे यांनी आपल्या कारकिर्दीत काही नाटके लिहिली. लोकशाही, हिंदू समाज आणि हिंदूंची राजकीय प्रतिमा, सामाजिक जीवनातील तर्कनिष्ठेचे महत्त्व, तत्त्वज्ञान व राष्ट्रीयत्व यांच्यातील विरोधाभास अशा अनेक विषयांवर अतिशय विपुल प्रमाणात निबंध लेखनही केले. त्यांना रामायण व महाभारतातील पौराणिक राजकारणाचे आकर्षण होते. त्याचा ते आपल्या लेखनात पुरेपूर वापर करत; उदाहरणार्थ भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म हा त्यांचा निबंध (१९६५). त्यांचे माजी विद्यार्थी विद्याधर पुंडलिक यांनी सहस्रबुद्धे यांच्यावर निबंध लिहिला आहे. सहस्रबुद्धे यांनी धार्मिक अंधश्रद्धांबद्दल केलेल्या टिकात्मक लेखनाचा ऊहापोह 'महाराष्ट्रातील ग्रीक शिक्षक: डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे' असे शीर्षक असलेल्या या निबंधात आहे. परंपरा व अनुसरण याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात असलेले कोडे ते कसे सोडवीत, या विषयीही या निबंधात आहे. १९३० ते ४०च्या काळात मूलगामी तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी सहस्रबुद्धे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे आकर्षित झाले होते.

उजव्या विचारसरणीच्या या हिंदुत्ववादी संघटनेकडे ते कसे गेले, याचे वर्णन यात आहे. कालांतराने मात्र त्यांचा 'आरएसएस'च्या मार्गांबाबत भ्रमनिरास झाला व त्यांनी संघाला १९४० च्या दशकात रामराम ठोकला. सहस्रबुद्धे यांचे काही प्रबंध खूपच गाजले.

सहस्रबुद्धे यांनी उतारवयातही अभ्यास मंडळांच्या माध्यमातून लिखाण आणि अध्यापन चालूच ठेवले होते. त्यांचे ४ मार्च १९८५ साली पुण्यात निधन झाले

(सौजन्य : टाटा टेक्नॉलॉजीस)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# व्यायामाचा अतिरेक ठरतो धोकादायक!

काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील एका २४ वर्षीय तरुणीला अचानक आयसीयूमध्ये दाखल करावे लागले होते. डॉक्टरांच्या माहितीनुसार या तरुणीच्या लघवीचा रंग हा अक्षरशः काळा झाला होता. हॉस्पिटलमध्ये लगेचच तिच्यावर उपचार सुरू करण्यात आले, पण मुळात ही स्थिती कशामुळे उद्भवते हे समजून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. या तरुणीने आपला विश्रांतीचा वेळ कमी करून व्यायामाचा वेळ व तीव्रता दोन्ही वाढवली होती.



या प्रकरणाविषयी सांगताना सेलिब्रिटी फिटनेस ट्रेनर डॉ. मिकी मेहता यांनी व्यायामाच्या अतिरेकाने होणारे परिणाम व लक्षणे सांगितली आहेत. डॉ. मेहता म्हणतात की, व्यायामामुळे शारीरिक तंदुरुस्ती सुधारते, मूड सुधारतो आणि तुम्हाला अधिक ऊर्जा मिळते, पण जास्त व्यायाम करणे शरीर आणि मनासाठी नुकसानदायक असू शकते. जेव्हा व्यायामाचे प्रमाण, वारंवारता किंवा कालावधी शरीराच्या रिकव्हरी होण्याच्या क्षमतेपेक्षा अधिक असते, जेव्हा व्यायाम स्नायूंच्या, फुफ्फुसाच्या आणि हृदयाच्या क्षमतेच्या पलीकडे जातो, तेव्हा त्याला अतिव्यायाम म्हणतात. तुम्हाला आठवड्यातून १५० मिनिटांचा मध्यम तीव्रतेचा व्यायाम पुरेसा ठरू शकतो.

**व्यायामाने शरीराला खूप थकवताय का? ही आहेत लक्षणे**

तुम्हाला नेहमीचीच कामे करत असतानासुद्धा ऊर्जा कमी झाल्याचे जाणवणे, सुस्त वाटणे, स्नायूंना वेदना जाणवणे, चालताना, उभे राहताना, बसताना सांधे दुखणे, काहींना तर तीन दिवसांपर्यंत किंवा त्यानंतरही वेदना जाणवतात, चिडचिड वाढणे, धडधड वाढणे व श्वास घेताना अडचण येणे, व्यायामानंतर श्वासांची लय मूळ पदावर येण्यासाठी खूप वेळ लागणे, सतत इजा होणे.

**अतिव्यायाम करता तेव्हा शरीरात काय बदलते?**

सतत उच्च तीव्रतेचा व्यायाम केल्याने शरीरात कॉर्टिसोलचे प्रमाण जास्त आणि टेस्टोस्टेरॉन पातळी कमी होऊ शकते. हे हार्मोनल बदल वारंवार वजन वाढणे, स्नायू कमी होणे, थकवा आणि अतिरिक्त पोटातील चरबीसाठी कारणीभूत असू शकतात. तुमची रोगप्रतिकारक शक्तीपण कमी होऊ शकते. अतिव्यायाम केल्याने तुमच्या हाडांना, स्नायूंना इजा होऊ शकते. फुफ्फुसातील कार्बनडाय ऑक्साईड, ऑक्सिडेटिव्ह ताण व शरीरातील लॅक्टिक ॲसिडची पातळी यांच्यातही वाढ होऊ शकते.

व्यायाम करायचाच नाही किंवा खूपच व्यायाम करायचा ही दोन्ही टोके टाळायला हवीत. तुम्हाला शरीराला आवश्यक व्यायाम दिल्यावर शांत करणेसुद्धा आवश्यक आहे. लक्षात घ्या व्यायाम हा आनंद असायला हवा, शिक्षा नाही.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

# शिमग्याच्या काळात माणगावमध्ये वाहतूक कोंडी

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणातील होळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि गावाकडे परतण्याचा सोहळा, पण यंदा माणगाव आणि इंदापूर परिसरात मात्र सणाचा रंग वाहतूक कोंडीने फिका केला आहे. तासनतास वाहनांच्या रांगा, कडक उन्हात अडकलेली लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांची होणारी परवड या साऱ्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संतापाची भावना उसळली आहे. ऐन शिमग्याच्या काळातच लोकांनी प्रशासनाच्या नावाने शिमगा करत संताप व्यक्त केला.



माणगाव आणि इंदापूर येथील बायपास रस्त्याचे काम वर्षानुवर्षे रखडल्याने कोकणात जाणाऱ्या पर्यटकांना आणि चाकरमान्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गेले चार दिवस होळीच्या सुट्ट्यांमुळे लाखो कोकणवासीय गावाकडे निघाले, मात्र या मार्गावर तासन्तास कोंडीत अडकून त्यांचा उत्साह मावळला.

काही वाहनचालकांकडून नियमभंग होत असल्याने किरकोळ अपघात घडतात आणि त्यातून कोंडी आणखी वाढते. रस्त्यावरील अपूर्ण कामे, खड्डे आणि अरुंद मार्ग यामुळे परिस्थिती गंभीर बनली आहे. माणगाव पोलिसांनी कोंडी सोडवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. ठिकठिकाणी बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण आणि पर्यायी मार्गांचा सल्ला देण्यात आला, मात्र मनुष्यबळ अपुरे असल्याने त्यांचे प्रयत्न तोकडे पडत आहेत. उन्हात उभे राहून कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांनाही ताण सहन करावा लागत आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाबाबत अनेकवेळा मुदती जाहीर झाल्या. त्यानंतर काम आता पूर्णत्वास येणार आहे, परंतु माणगाव बायपास पूर्णत्वास गेलेला नाही, अशी नागरिकांची खंत आहे. होळीच्या उत्सवात विविध पक्षांचे पदाधिकारी सोंग आणि मुखवटे घालून आश्वासने देतात, अशी उपरोधिक टीका करत संतप्त नागरिकांनी खोट्या आश्वासनांचे दहन केल्याची चर्चा परिसरात रंगली. शिमग्याच्या पारंपरिक ज्वाळांमध्ये यंदा लोकप्रतिनिधींच्या अपूर्ण वचनांचाही प्रतिकात्मक अंत केल्याचे चित्र पहायला मिळाले. रुग्णवाहिका अडकणे, लहान मुलांचे रडणे, ज्येष्ठ नागरिकांचा त्रास-या सगळ्यामुळे प्रवाशांच्या भावना उफाळून आल्या. सण साजरा करायला निघालो आणि रस्त्यातच अडकलो, अशी हळहळ अनेकांनी व्यक्त केली. मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातांची मालिका आणि रखडलेली कामे यामुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे. त्यामुळे तातडीने बायपासचे काम पूर्ण करून सुरक्षित आणि सुरळीत वाहतुकीची व्यवस्था करावी, अशी एकमुखी मागणी होत आहे.

होळीच्या रंगात न्हालेल्या कोकणात यंदा मात्र संतापाचा लाल रंग अधिक गडद दिसत आहे. प्रवाशांची ही बोंबाबोंब केवळ नाराजी नसून ती प्रशासनाला दिलेली एक ठाम चेतावणी आहे.

## ममदापूरमध्ये शर्यतीचा बैल चोरीला; नेरळ पोलिसांकडून आरोपी जेरबंद



**नेरळ ; प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत ममदापूर येथे शर्यतीचा बैल चोरी केल्याची घटना उघड होताच नेरळ पोलिसांनी अवघ्या काही तासांत तपासाची चक्रे फिरवत आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळवले. पोलिसांच्या कार्यतत्परतेमुळे चोरी गेलेला बैल प्रकरण तातडीने उलगडले असून परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

कर्जत तालुक्यातील ममदापूर ग्रामपंचायत हद्दीत २१ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी धनंजय उर्फ बाबू पाटील यांच्या गोठ्यातील पत्र्याच्या दरवाज्यावरील कडीचा हुक तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर त्यांच्या मालकीचा शर्यतीत सहभागी होणारा गोवंशीय जातीचा बैल चोरून नेण्यात आला.

या घटनेची माहिती मिळताच धनंजय (बाबू) पाटील यांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रार दाखल होताच नेरळ पोलिसांनी वेगाने तपास सुरू केला. घटनास्थळाची पाहणी, स्थानिकांकडून चौकशी आणि गुप्त माहितीच्या आधारे गावातीलच एका अल्पवयीन तरुणाचा सहभाग समोर आला. त्याने चोरी केलेला बैल दामत गावातील फुरकान नजे, हुजूर नजे तसेच ममदापूर येथील मोहम्मद अर्षद हमद तांबोळी यांना विक्रीसाठी दिल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे नेरळ पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधितांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. कायदेशीर कारणास्तव अल्पवयीन आरोपीचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही.दरम्यान, तपासादरम्यान चोरीस गेलेल्या बैलाची हत्या केल्याचेही समोर आले असून या प्रकरणात संबंधितांवर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. पोलिसांनी या संदर्भातील साहित्य जप्त केले आहे.

## कर्जतमध्ये धुळवड उत्साहात साजरी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात पारंपारिक पध्दतीने होळीचा सण साजरा केला जातो. होळी आणि धुळवड हे दोन दिवस हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करुन विविध रंगाची उधळण करुन धुलवड साजरी केली जाते. लहानग्यांनी मोठया प्रमाणात धुळवड साजरी करून विविध रंगाची उधळण केली. तर युवकांनी वाजत गाजत धुळवड साजरी केली.

लहान मुलांना होळीचे वेध अगोदर पासून लागले असतात बाजारात विक्री साठी आलेल्या विविध प्रकारच्या पिचकाऱ्या खरेदीसाठी लहान मुलांचा हट्ट असतो. होळी झाली की दुस-या दिवशी धुळवड साजरी केली जाते. या दिवसाची मुलांसह मोठी माणसेही वाट बघत असतात, आदल्या दिवशी होळीचे किती जागरण झाले तरी लहान मुले सकाळी लवकर उठून हातात पिचकारी घेऊन धुळवड साजरी करायला बाहेर पडतात. आपल्या हातातील पिचकारीने दुसऱ्याच्या अंगावर रंग उडवत आनंद साजरा करत असतात आणि मग या मध्ये मोठी माणसे, महिला एकमेकांना विविध रंगानी रंगवुन, भिजवून धुळवड साजरी करतात. बच्चे कंपनीं सह मोठ्यांनी एकमेकांच्या चेहऱ्यावर सुके रंग लावून पाण्याचा वापर करून मोठ्या प्रमाणात धुलवड साजरी केली. काही ठिकाणी बच्चे कंपनी रस्ता अडवून बसतात व येणाऱ्या - जाणाऱ्या वाहनांना अडवून चालकांकडून पोस्त ( पैसे ) मागून घेतात.

घरोघरी जाऊन लहान मुले व युवक घरा समोर नाचून होळीचे पोस्त गोळा करतात. दुपार नंतर सर्व जण कडाव नजिकच्या पेज नदीवर जाऊन आंघोळ करतात. त्यानंतर जमलेल्या पैश्याचे सुग्रास स्नेह भोजन किंवा पुरी भाजी, पाव भाजी, वडापाव आदी नाश्ता करतात. अशा प्रकारे धुळवड साजरी करण्यात आली.

## तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालय येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय शास्त्रज्ञ सी. व्ही. रमन यांनी १९२८ साली कोलकाता येथे लावलेल्या ऐतिहासिक 'रमन प्रभाव' या शोधाच्या स्मरणार्थ २८ फेब्रुवारी हा दिवस देशभर राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. विज्ञानाच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारा हा दिवस महाविद्यालयात ज्ञान, प्रयोग आणि प्रेरणेचा उत्सव ठरला.




कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष अँड.राजीव साबळे आणि प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्या शुभहस्ते झाले. विज्ञानाच्या प्रगतीत विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन करत त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन केले. विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आकर्षक विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले. शाळांसाठी उपयुक्त पोस्टर्स,विविध वैज्ञानिक मॉडेल्स,११ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकडून मानवी जीवन प्रक्रिया, मानवी हृदय, डायलिसिस, फुफ्फुसांचे कार्य यांसारखी जिवंत व परिणामकारक प्रात्यक्षिके

विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाशी संबंधित प्रयोग सादर करून त्यामागील शास्त्रीय कारणे स्पष्ट केली. विविध रासायनिक प्रयोगांचे थेट प्रात्यक्षिक दाखवून विज्ञानावर आधारित विचारसरणीची गरज अधोरेखित करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुदर्शन कोलोनंट्स इंडिया लि. येथील प्लांट मॅनेजर शरद पाटील व उत्पादन कार्यकारी रवी मोरे उपस्थित होते. त्यांनी औद्योगिक क्षेत्राचा आढावा या विषयावर मार्गदर्शन करत उद्योग क्षेत्रातील संधी, रचना आणि आव्हाने यांची सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या दिशा समजल्या. या विज्ञान प्रदर्शनाला विविध विभागांतील प्राध्यापकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन क्विझ स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते,कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विज्ञान विभाग प्रमुख सहा. प्रा. मेहरीन डावरे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## वावंढळ गावात होळी सण उत्साहात साजरा

**चौक : प्रतिनिधी**

कोयना जांब्रुक वावंढळ या गावचा शिमगा मोठ्या उत्साहात आणि परंपरेनुसार संपन्न झाला. कोयना जांब्रुक वावंढळ हे गाव कोयना धरणामुळे बाधित होऊन रायगड जिल्हा, खालापूर तालुक्यातील वावंढळ या ठिकाणी वसले आहे.



६६ वर्षांपूर्वी जुन्या गावात असलेली रूढी परंपरा आजही नवीन गावात अबाधित आहे. पहाटे पाच वाजता होळीला फेऱ्या मारून होळी मानकरी यांच्या हस्ते पेटविण्यात आली. त्या नंतर तरुण पिढीने पालखी नाचवली, सकाळी पालखी सानेवार बसल्यावर पालखीत श्री जानाई व श्री इंजाई यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली. त्या नंतर ग्रामस्थानी दोन्ही देवींची ओटी भरली.

कोयना प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या या गावाने आजही आपली रूढी परंपरा राखल्याने गावच्या परिसरातील अनेक गावांतील भाविक येथे देवीची ओटी भरण्यासाठी येतात. आज पालखी स्थानापन्न असून उद्या पासून गावचे मानकरी यांच्या घरी देवीचे आगमन होईल, त्या नंतर प्रत्यक घरी पालखी जाईल.



मुरुड : येथील परिसरात होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कोळीवाड्यात पारंपरिक वेशात, वाद्याच्या तालात होलिकामातेचे पूजन करून रात्री १२ वाजता दहन करण्यात आले. त्याची ही चित्रमय झलक.


**TENDER NOTICE**

Sealed Tenders/Offers are invited by Kasturi-II Co-operative Housing Society Ltd, Plot No. 456, Takka Village, Panvel, Dist- Raigad 410206 for proposed Redevelopment from Builders / Developers of repute. Plot area for proposed plot is 6694 Sqmt The Tender Document can be collected from the PMC Office. (Contact name-Neha Raut+91 8803228888) from Date. 04/03/2026 To 19/03/2026 (Both dates included) between 10:00am to 6:00pm on payment of Rs 25,000/- (Non-Refundable) by Demand Draft in favour of Kasturi-II Co-operative Housing Society Ltd. Sealed Tender Bids shall be submitted in the manner as prescribed in the instructions to tenderers as mentioned in Tender Document on and before 27/03/2026 by 5:00pm in the PMC Office Urban Analysis & Solution Consultancy Services, A-1308 to 1309, Shelton Sapphire, Plot no. 18/19, Sector-15, CBD Belapur, Navi Mumbai. The Society reserves right to reject any or all bids without assigning any reason.

sd/- **Chairman** sd/- **Secretary** sd/- **Treasurer**

For Kasturi-II Co-operative Housing



ने.ता ४/०४/२०२६
अँड आशा अरुणकुमार भगत
मो ८१०८३५५०००

**जाहीर नोटीस**

**उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ.अर्ज क्र. १३२/२०१९
निशाणी क्रमांक

१. कै गोविंद दामाजी पाटील यांचे वारस
१.१ श्री प्रदीप गोविंद पाटील
वय ४२ वर्षे भंदा नोकरी
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
१.२ श्री मननाथ गोविंद पाटील
वय ३७ वर्षे धंदा नोकरी
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
१.३ सौ. वासंती रोहीदास नाईक
वय ४० वर्षे धंदा घरकाम
रा.मु. डुंगी पो पारगाव ता पनवेल
२. कै. रामकृष्ण दामाजी पाटील यांचे वारस
२.१ श्री. निशान रामकृष्ण पाटील
वय ३२ वर्षे धंदा-नोकरी
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
२.२ श्री. मंगेश रामकृष्ण पाटील
वय ३१ वर्षे धंदा-नोकरी
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
२.३ सौ. मनिषा चंद्रकांत पाटील
वय ३२ वर्षे धंदा-घरकाम मु.मोठीजुई ता.उरण
३. सौ. मथुराबाई दयाराम भोईर
वय ५३ वर्षे धंदा-नोकरी
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
४. श्री सदानंद दामाजी पाटील
वय ५३ वर्षे धंदा-काहीनाही
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
५. श्री. राजाराम दामाजी पाटील
वय ४५ वर्षे धंदा-नोकरी
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
६. श्री. जगन उर्फ जगन्नाथ दामाजी पाटील
वय ४५ वर्षे धंदा-नोकरी
रा पागोटे पो जे.एन.पी.टी.ता उरण जि रायगड
७. सौ. भावना तुकाराम भोपी
वय ४२ वर्षे धंदा-घरकाम
रा भोनंग पो सुडकोली ता अलिबाग जि रायगड
८. सौ. भीमाबाई रमेश पाटील
वय ५८ वर्षे धंदा-घरकाम मु भांडुप मुंबई
९. सौ. कमलाबाई हरेश्वर पाटील
वय ४० वर्षे धंदा-घरकाम रा पागोटे ता उरण जि रायगड
अर्जदार

अर्जदार क्रमांक १ ते ९ यांची आई **कै बामीबाई दामाजी पाटील** हया दिनांक १६/०९/२०१३ रोजी मयत झाले त्यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै बामीबाई दामाजी पाटील यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत.

सदरहु कै बामीबाई दामाजी पाटील यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असणा-या खालील वर्णनाचा भुखंड होता व त्याचे वर्णन येणेप्रमाणे :-

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे-नवघर, ता.उरण, जि. रायगड**

| युनिट केस क्र | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| नवघर ४५२/८५-८६ | २ | १३ | ०-०२-० | |
| नवघर ४५२/८५-८६ | १९२ | ४ | ०-०१-१२ | |
| नवघर ४५२/८५-८६ | १९२ | १० | ०-०७-४ | |
| नवघर ४५२/८५-८६ | १९९ | २ | ०-०९-४ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २०३ | ४ | ०-१५-४ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २१० | ८ | ०-०७-० | |
| नवघर ४५२/८५-८६ | २२० | ५ | ०-१६-१२ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २५९ | ६ | ०-०२-८ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २६२ | ६ | ०-०६-४ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २६३ | ८ | ०-०३-० | |
| नवघर ४५२/८५-८६ | २६३ | १३ | ०-०४-० | |
| नवघर ४५२/८५-८६ | १८२ | ५ | ०-२८-४ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २६४ | ३ | ०-००-८ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २६४ | ११ | ०-१७-० | |
| नवघर ४५२/८५-८६ | २९२ | ४ | ०-१३-१२ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २९२ | ८ | ०-०७-८ | |
| नवघर ४५२/८५-८६ | २९४ | ९ | ०-०४-० | |
| नवघर ४५२/८५-८६ | २९८ | ५ | ०-१६-० | |
| नवघर ४५२ (१) | २०२ | १६ | ०-१८-० | |

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर उरण**

शिक्का

**सही/-**
**सह अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर उरण**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, मौजे गौळवाडी ता.कर्जत, जिल्हा रायगड येथील खालील प्रमाणे हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित जमिन मालक श्री. सुभाष देविदास घाडगे यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे नं | क्षेत्रफळ. हे.आर चौ.मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | ३७/३२ | ०-१८-०० | ०.१६ |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिंज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितानी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तकार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तकारी अगर हरकती आमने अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तकारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : रिस
दिनांक : २३/०२/२०२६

**sd/-**
**Adv.Sachin R Chalke**
**B.A LL.B**

Office: 107, Gokul Nagari Building, 1s "Floor, Village: Rees. Post. Mohopada, Tal-Khalapur, Dist-Raigad, Maharashtra, Pin No.410222. Mob:8180823040
Email:srchalke1979@gmail.com

# सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर भरण्याची सुविधा

## नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे मालमत्ता कर वसुलीची मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू आहे. चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आता केवळ एक महिना शिल्लक आहे. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांना कर भरण्यास अधिक सुविधा मिळाव्यात, यासाठी महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील ८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार व गुढीपाडवा, श्रीराम नवमी आणि महावीर जयंती या सार्वजनिक सुट्टींच्या दिवशीही सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत सुरू असणार आहेत.



नवी मुंबई शहरातील मालमत्ताधारकांना कर भरण्यासाठी ८ विभागीय कर संकलन कार्यालये कार्यान्वित असून तेथे कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालकेची वेबसाईट, चू छ्वचउ प, सर्व बँकांचे डेबिट कार्ड, आरटीजीएस, सर्व प्रकारच्या यूपीआय सुविधा याव्दारे ऑनलाईन पद्धतीने कोणत्याही महापालिका कार्यालयात अथवा कर संकलन केंद्रात जावे न लागता भरबसल्या मोबाईलच्या एका क्लिकवरून कर भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.आता मालमत्ता कर विभागाच्या वतीने थकबाकीदारांविरोधात कठोर कारवाई सुरू करण्यात आलेली असून,थकबाकीदारांच्या मालमत्तांची जप्ती कारवाई करण्यात येत आहे

नवी मुंबई महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या वतीने विविध माध्यमांतून नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांसाठी ऑनलाईन कर भरणा करण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत ही सुविधा उपलब्ध असणार आहे. शहरातील करदात्यांनी मालमत्ता कराचा भरणा वेळेत करून शहराच्या विकासामध्ये हातभार लावावा तसेच थकबाकीदारांवर होणारी कारवाई टाळण्यासाठी आपला थकीत मालमत्ता कर विहित वेळेत भरावा, असे आवाहन आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

# ऋतुमानानुसार होणारी पानगळ नैसर्गिक प्रक्रिया

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र हे पानझडी जंगल स्वरूपाच्या क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे येथे काही झाडांची पानगळती होऊन त्या झाडांना कालांतराने नवी पालवी फुटत असते.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात निरनिराळया जातीची वृक्षसंपदा मोठया प्रमाणात आहे. त्यामधील काही झाडांची पानगळती विशिष्ट ऋतूनुसार होताना दिसून येते. या पानगळतीबाबत पर्यावरणप्रेमी, समाजसेवक, पत्रकार, वृक्षप्रेमी, नागरिक यांच्याकडून विविध माध्यमांतून चिंता व्यक्त होताना दिसून येते.



वास्तविकत: हिवाळयात झाडांची पाने गळणे ही अत्यंत नैसर्गिक आणि महत्वाची प्रक्रिया आहे हे समजून घेणे महत्वाचे आहे. याला शास्त्रीय भाषेत पर्णपात असे म्हणतात. हिवाळयात झाडांमध्ये ऐबासीसिक सिड नावाचे संप्रेरक तयार होते. यामुळे फांदी आणि पानांच्या देठांमध्ये एक पातळ स्तराची भिंत तयार होते. या स्तरामुळे पानाला मिळणारे पाणी आणि पोषक तत्त्वे थांबतात आणि पाने सुकून खाली पडतात. मात्र काही कालावधीनंतर या झाडांना नवी पालवी फुटते.नवी मुंबई महानगरपालिका उदयान विभागामार्फत वृक्षांची वेळोवेळी योग्य ती निगा राखली जाते.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमात बालगायिका कलिना दासचा सन्मान



**नवी मुंबई : बातमीदार**

'हिंद-दी-चादर' प्रचार आणि प्रसिद्धी उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या गीतगायन स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ४२, घणसोली येथे चौथीतील विद्यार्थिनी कलिना दास हिने सुप्रसिध्द गायक सतिंदर सरताज यांनी गायलेल्या हिंद-दी.-चादर श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनचरित्रावर आधारित लोकप्रिय भक्तिगीताचे अत्यंत सुंदर गायन केले होते. तिच्या गायनाच्या चित्रफितीला देशभरातून लाखो लाईक आले व अनेकांनी ती चित्रफित आपल्या सोशल मिडिया अकाऊंटवरून शेअर केली. महानगरपालिकेने विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे आयोजित केलेल्या हिंद-दी-चादर विशेष सांस्कृतिक कार्यक्रमातही तिने सादर केलेल्या या भक्तीगीताला प्रचंड दाद मिळाली होती.

यामुळे हिंद-दी-चादर अंतर्गत खारघर येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या दोन दिवसीय समारंभप्रसंगी बालगायिका कलिना दास हिला विशेष निमंत्रित करण्यात आले होते.

याप्रसंगी कलिना दास व तिच्या पालकांचा कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते विशेष सन्मान करण्यात आला. मूळची आसाम राज्यातली असलेली कु.कलिना दास ही नवी मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळेत शिकत आहे

# आमदार मंदा म्हात्रे घेणार बस, कारचालकांच्या मागण्यांबाबत परिवहन आयुक्तांबरोबर बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

बस-कार वेल्फेयर असोसिएशन, नवी मुंबई यांच्या वतीने सार्वजनिक सेवा वाहतूकदारांवर अलीकडे लागू करण्यात आलेल्या विविध कायदे व नियमांच्या अन्यायकारक व एकतर्फी अंमलबजावणीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. या संदर्भात असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार मंदा म्हात्रे यांच्या गौरव निवासस्थानी भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. सदर निवेदनामध्ये एल मोटार वाहन विभाग व पोलीस विभाग यांच्या महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणारी ई-चलन प्रणाली सार्वजनिक जनता व वाहनधाकडून जबरदस्तीने दंड वसूल करून वाहनधारकांची नियमबाह्यरीतीने लूट करणे, ई-



चलन दिल्यावर रिअल टाइम बेसिसवर त्वरित मेसेज न दिला जाणे, ई-चलनाचे फॉरमॅट व रिसिप्ट मान्यता प्राप्त नाही, ई-चलन देतांना पुरावा कायद्यानुसार आवश्यक पुरावे नसतांना दंड वसूल करणे, चलना सोबत जोडण्यात आलेले गुन्ह्याबाबतचे फोटो अस्पष्ट असतांना ही दंड वसुली करणे, प्रणालीमध्ये अडवून दंड वसुली करणे अशा अनेक विविध प्रकारच्या मागण्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या समोर मांडल्या. त्याच अनुषंगाने त्वरित आमदार मंदा म्हात्रे यांनी परिवहन आयुक्त राजेश नार्वे कर यांना दूरध्वनी संपर्क साधून बस-कार वेल्फेयर असोसिएशन, नवी मुंबई यांनी उपस्थित केलेल्या विविध मागण्यांवर चर्चा केली व सदर मागण्यांवर लवकरच बैठक घेऊन सदरचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार असल्याचे परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगितले.

तसेच वाहतूकदारांवर होत असलेल्या कठोर दंडात्मक कारवाया, परवाना व कागदपत्रांबाबत निर्माण होणाऱ्या अडचणी तसेच नियमांची अवास्तव अंमलबजावणी यामुळे व्यवसायावर गंभीर परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. असोसिएशनच्या मते, वाढते इंधन दर, विमा प्रीमियम, करभार आणि देखभाल खर्च यामुळे वाहतूक व्यवसाय आधीच आर्थिक संकटात आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाकडून होत असलेली कठोर कारवाई ही अन्यायकारक असून ती तात्काळ थांबविणे आवश्यक आहे.

नियमांची अंमलबजावणी करताना वास्तव परिस्थितीचा विचार करावा. दंड आकारण्यापूर्वी सूचना व समुपदेशनाची प्रक्रिया राबवावी. या सर्व मागण्यांवर विचारपूर्वक निर्णय घेऊन प्रश्नी मार्गी लावण्यात येणार असल्याचे परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगितले.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत वाहतूकदार बचाव कृती संघटनेचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस विलास हुले पाटील, नवी मुंबई बस -कार ओनर्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भास्कर पापडे, खजिनदार विजय कदम, सचिव प्रवीण लोकरे, सहसचिव फिरोज मुलानी उपस्थित होते.

# विद्याभवनच्या शिक्षकांचा अभ्यास दौरा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील शिक्षण संकुलातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विज्ञान दिनी २८ फेब्रुवारी रोजी पुणे जिल्ह्यातील जालिंदरनगर येथील प्रसिद्ध जिल्हा परिषद शाळा आणि पाबळ येथील प्रसिद्ध विज्ञान आश्रमास भेट दिली.

पुणे जिल्ह्यातील जालिंदरनगर (कण्हेरसर) या दुर्गम भागात असलेल्या जिल्हा परिषद शाळेने जगातील पहिल्या दहा नामवंत शाळांमध्ये स्थान मिळवले. त्या शाळेतील शिक्षक दत्ताजी वारे गुरुजींच्या नेतृत्वात सर्व ग्रामस्थ मंडळींच्या सहकार्याने शाळेचा भौतिक आणि बौद्धिक दृष्टीने कायापालट झाला. शिक्षण क्षेत्रातील अनेक जाणकार या शाळेला आवर्जून भेट देतात.

नेरूळ विद्याभवन शिक्षण संकुलाचे संचालक दिनेश मिसाळ यांनी सर्व शिक्षकांसह संकुलात कार्यरत असणाऱ्या सर्वांना या शाळेचा प्रत्यक्ष अनुभव यावा यासाठी नियोजन करून हा अभ्यास दौरा घडवून आणला. विद्याभवनच्या शिक्षकांनी जिल्हा परिषद शाळेच्या प्रत्येक गोष्टीतील वेगळेपण अभ्यासले. पुष्पलता कानडे या शिक्षिकेशी तसेच काही ग्रामस्थांशी चर्चा करून शाळेसंबंधी इतिहास, अभ्यासतंत्रे जाणून घेतली.

पाबळ येथील विज्ञान आश्रमास देखील भेट देण्यात आली. प्रा. सुयोग यांनी 'लर्निंग बाय डूइंग' हे विज्ञान आश्रमातील तत्व विशद करून विज्ञान आश्रमात चालणारे उपक्रम आणि त्यातून अतिसामान्य विद्यार्थ्यांना होणारा फायदा या विषयी सर्व माहिती दिली. आश्रमात चालणारे उपक्रम सर्व शिक्षकांना प्रत्यक्ष पाहता आले.

# नेवाळी गावात स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांच्या तर्फे श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दिनांक १/३/२०२६ रोजी नेवाळी गावात ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले .यामध्ये श्री समर्थ बैठक नेवाळी येथील एकूण १७५ श्री सदस्यांनी उस्फूर्त पणे सहभाग घेऊन नेवाळी गावातील गणेशघाट , पाणवठा ,जिल्हा परिषद मराठी शाळा आणि पाण्याच्या टाकीचा परिसर स्वच्छ करून संपूर्ण परिसर सुंदर केला=ज=जयामध्ये सर्व श्री सदस्यांनी जवळ जवळ ७०० ज्ञस ओला कचरा आणि ४५०ज्ञस सुका कचरा असा एकूण ११५० ज्ञस कचरा गोळा करण्यात आला.. सर्व श्री सदस्यांनी आनंदात स्वच्छता अभियान यशस्वी केले..यामुळे नेवाळी गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले सर्व गावकऱ्यांनी श्री सदस्यांचे कौतुक केले.. या स्वच्छता अभियानासाठी श्री राजेश काथारा ग्रामपंचायत सदस्य श्री संतोष काथारा समाज सेवक आणि श्री उमेश पाटील पत्रकार उपस्थित होते यांनीही सर्व श्रीसदस्यांचे कौतुक केले



# तीन दिवसीय जनगणना प्रशिक्षणवर्गाची यशस्वी सांगता

**नवी मुंबई : बातमीदार**

जनगणना २०२७ कार्यक्रमांतर्गत प्रथम टप्प्यामध्ये घरांची गणना करणेबाबत तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रामध्ये यशस्वीरित्या संपन्न झाला. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ झालेल्या या ३ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात राज्य जनगणना संचालक श्रीम.तेजल कटारे आणि सांख्यिकी अधिकारी श्री. तुषार पाटील यांनी शास्त्रोक्त पध्दतीने घरांची गणना करण्याबाबतचे प्रशिक्षण उत्कृष्ट रितीने दिले.



प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी परिमंडळ २ उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी संजय शिंदे यांनी ज्याप्रमाणे निवडणुकीच्या कामात नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांनी राज्यामध्ये सर्वोत्कृष्ट काम केले त्याप्रमाणेच जनगणना कामात देखील महापालिकेचा पहिल्या तीनमध्ये नंबर येईल अशी ग्वाही आयुक्त महोदयांना सर्व अधिकारी - कर्मचारी यांच्या वतीने दिली.

जनगणनेचे काम हे राष्ट्रीय काम असून सर्वांनी ही जबाबदारी ओळखून आपापले काम चोखपणे पार पाडावे असे आवाहन त्यांनी केले. जनगणना हे काम देशासाठी अतिशय महत्त्वाचे असून विविध योजना राबवण्यासाठी शासनास आणि देशास आवश्यक असलेली सांख्यिकी माहिती याद्वारे प्राप्त होते. लोकसंख्या जनगणना २०२१ च्या कामामध्ये करोना लाटोमुळे उशीर लागला असून वेळीच जनगणना झाली असती तर महापालिका निवडणुकीकरिता लोकसंख्येचा योग्य आकडा प्राप्त होऊन महानगरपालिकेच्या 'क' श्रेणीतही वाढ होऊ शकली असती असे त्यांनी सांगितले. जनगणना कामांमध्ये टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट करीत त्यांनी प्रशिक्षकांचे आभार मानले.

प्रशिक्षणासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा चार्ज अधिकारी यांच्यासमवेत कर्मचारी उपस्थित होते.

# चिरनेरच्या श्रीया मन्नाचे शैक्षणिक, स्पर्धात्मक यश

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमाची इयत्ता दुसरीत शिकणारी विद्यार्थिनी श्रीया रणजित मन्ना हिने शैक्षणिक व स्पर्धात्मक क्षेत्रात घवघवीत यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

तिच्या या दैदिप्यमान कामगिरीबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष पी.पी. खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, खजिनदार समीर खारपाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेत तिचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी तिला समारंभपूर्वक गौरविण्यात आले. प्रशासकीय अधिकारी व्ही ए पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहाद्दूर, मुख्याध्यापिका मंदा



घरत, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मुख्याध्यापिका स्मिता मसुरकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहून, त्यांनी तिचे गोड कौतुक करून अभिनंदन केले.

श्रीया हिने प्रोअक्टिव्ह अबॅकस नॅशनल कॉम्पिटिशन २०२५-२६ च्या स्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धेचा एकूण कालावधी ६ मिनिटांचा असतानादेखील श्रेयाने अवघ्या २.४४ मिनिटांत स्पर्धा पूर्ण करून प्रथम क्रमांक पटकावून, तिने Maths Magician of the Day हा मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार प्राप्त केला. अबॅकस स्पर्धेत तिने प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवत, आपल्या उत्कृष्ट गणिती कौशल्याची छाप पाडली. तिचा वेग आणि अचूकता पाहून सर्वजण प्रभावित झाले.

याशिवाय बालचित्रकला स्पर्धेतही तिने पारितोषिक मिळवून आपल्या सर्वांगीण गुणवत्तेची प्रचीती दिली. याशिवाय रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या बालचित्रकला या स्पर्धेतदेखील तिने नेत्रदीपक यश संपादन करत विजेतेपद पटकावले. श्रीयाने निवडलेल्या विषयाचे सखोल आकलन करून अत्यंत सुंदर आणि संदेशपूर्ण चित्र साकारले होते. स्पर्धेत प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन तिला गौरविण्यात आले. तसेच ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग) हिने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले.

बक्षीस वितरण समारंभात श्रीया मन्ना हिला पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# शिष्यवृत्ती योजनेच्या कागदपत्र पूर्ततेसाठी मनपाकडून मुदतवाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रातील विदयार्थ्यांकडून शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेसाठी लाभार्थी नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावयाची प्रथम मुदत दि. २० जून २०२५ ते दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत होती. त्याचप्रमाणे दि. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेकरीता जाहीर आवाहन प्रसिध्द करण्यात आले होते.

त्यानंतर वरील योजनेअंतर्गत लाभार्थी नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावयाची व्दितीय मुदत दि. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत व विहित नमुन्यातील ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यास दि. ३१ ऑगस्ट २०२ रोजीपर्यंत व्दितीय मुदतवाढ त्याचप्रमाणे लाभार्थी नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावयाची तृतीय मुदत दि. १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत व विहित नमुन्यातील ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यास दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत तृतीय व अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती.

त्याअनुषंगाने शिष्यवृत्ती अर्जाची तपासणी केली असता ज्या लाभार्थ्यांनी शैक्षणिक शिष्यवृत्ती अर्जासंदर्भातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही, अशा लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणेकामी अर्ज पुनश्च: पाठविण्यात आलेले आहेत.

तरी सदर लाभार्थ्यांना कागदपत्रांची पूर्तता करणेकामी दि. ०४ मार्च २०२६ पर्यंत अंतिम मुदत देण्यात येत आहे. त्याबाबतचे मेसेज लाभार्थ्यांना त्यांचे भ्रमणध्वनीवर पाठविण्यात येणार आहेत. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणा-या लाभार्थ्यांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील, याची कृपया सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

# रायगड जिल्ह्यात होळी, धुलिवंदन उत्साहात

## पडम कोळीवाड्यात जावयांचा मान



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील मेढा, देवकान्हे, खांब, सुतारवाडी, कोलाड, धाटाव, घोसाळे, चणेरा, यशवंतखार, नागोठणे आदी विभागात मोठ्या उत्साहात होळीचा सण साजरा करण्यात आला.

होळी उत्सवाची जय्यत तयारी आदल्या दिवसापासूनच सुरू होती. कामानिमित्ताने बाहेरगावी गेलेले ग्रामस्थ होळीसाठी आपल्या गावी आले होते. दिवसभर गोडधोड पुरणपोळीचा बेत गावागावातून दिसून आला. सायंकाळी होळी रचून पूजा-आरती करण्यात आली, नैवेद्य दाखवण्यात आला. मध्यरात्री तालुक्यात सर्वत्र होळी पेटवण्यात आली, तर काही ठिकाणी नागरिकांनी आपल्या घरासमोर वैयक्तिकरित्या होळीचे पूजन करत होळी पेटवण्यात आली.

पडम कोळीवाड्यात होळीनिमित्ताने जावयांना मान दिला जातो. जावयांच्या हस्ते होळीची पूजा करण्यात आले. यावेळी त्यांचे औक्षण करण्यात आले. पाटील कुटुंबियांनी गाण्यांचा कार्यक्रम ठेवला होता.

## नागोठण्यात पारंपरिक पद्धतीने सणाचे साजरीकरण

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहर व परिसरात होळीचा सण यंदा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. गावातील प्रत्येक वाड्या-वस्त्यांवर पारंपरिक पद्धतीने होळी प्रज्वलित करण्यात आली.

होळीच्या निमित्ताने घरोघरी पुरणपोळीचा सुगंध दरवळला. सुहासिनींनी पारंपरिक वेशभूषेत होळीला पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून श्रद्धाभावाने पूजा केली. कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी तसेच गावाच्या भरभराटीसाठी प्रार्थना करण्यात आली.





लहान मुलांनी होळीभोवती फेर धरत आनंद लुटला, तर युवकांनीही सणाच्या उत्साहात सहभाग घेत पारंपरिक रितीरिवाज जपले. ग्रामस्थांनी एकत्र येत सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला.

नागोठण्यात साजऱ्या झालेल्या या होळी सणाने पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडवत आनंद, भक्ती आणि ऐक्याची सुंदर सांगता केली. धुलिवंदनदेखील साजरे करण्यात आले. लहानांपासून मोठ्यां पर्यंत सर्व जण विविध रंगात नाहून निघाले होते.

## मजगाव मराठी शाळेत स्नेहसंमेलन रंगले

**मुरूड : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या मजगाव मराठी शाळेत तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन मुरुड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता वार्षिक स्नेहसंमेलनाने झाली.

वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांच्या हस्ते फीत कापून व पंचायत समिती सदस्य गणेश नाक्ती यांनी श्रीफळ वाढवून करण्यात आली. स्नेहसंमेलनात देशभक्तीपर गीते, लोकनृत्य, विनोदी नाटक, समूहगायन सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन घडवणाऱ्या या कार्यक्रमाला उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाटात दाद दिली.

कार्यक्रम यशस्वी आयोजनासाठी बाळासाहेब फुंदे, संतोष दहातोंडे, स्वप्नाली बाजी, शाळा व्यवस्थापन समितीच्य अध्यक्षा पूजा भोईर, उपाध्यक्ष केतन नाक्ती, निखील मानाजी, सदस्य योगेंद्र गोयजी, मिथून भोईर, प्रथमेश म्हात्रे, ग्रामस्थ व पालकांनी सहकार्य केल्याचे मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ यांनी प्रास्ताविकात नमूद केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन चव्हाण यांनी केले, तर हर्षा नांदगावकर यांनी आभार मानले.





## कर्जतमध्ये श्रीसदस्यांचे ग्रामस्वच्छता अभियान; हजारो किलो कचरा जमा

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब तथा नारायण विष्णू धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त कर्जत, माथेरान, कशेळे येथे ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये शेकडो किलो ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला.

अभियानामध्ये कर्जत परिसरातील ६२८ श्रीसदस्य, माथेरान भागातील ७८५ श्रीसदस्य, कशेळे येथे ४०० श्रीसदस्यांनी स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग घेतला होता. कर्जतमध्ये १२९०० किलो ओला कचरा व ३९०० किलो सुका कचरा गोळा केला. कशेळे येथे १७५० किलो ओला व ३७० किलो सुका कचरा गोळा केला. माथेरानमध्ये पाच टन प्लास्टिक बाटल्या गोळा केल्या गेल्या. या ग्रामस्वच्छता अभियानात शेकडोंच्या संख्येने श्रीसदस्य उपस्थित होते.



**माणगाव : साईनगर येथील तरुणांनी एकत्रित येत रंगांची उधळण करून धुलिवंदन उत्साहात साजरे केले.**

## खोपोलीत स्वच्छता उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सौजन्याने व ज्येष्ठ निरूपणकार डॉ.श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीपूर्ती सोहळ्यानिमित्ताने श्रीसदस्यांनी स्वच्छता उपक्रम राबविला.

सरकारी हॉस्पिटल, रस्ते, रेल्वे स्टेशन, सरकारी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, मराठी शाळा, पोस्ट ऑफिस परिसर स्वच्छ करण्यासाठी श्रीसदस्य हातात झाडू, घमेले, फावडे खुरपणे घेऊन मोहिमेत सहभागी झाले होते.

सकाळी ७.३० वाजता कामाला सुरुवात करण्यात आली. यावेळी ओला कचरा, सुका कचरा यांचे वर्गीकरण करण्यात आले. यासाठी श्रीसदस्यांना सुरक्षा साधने देण्यात आली होती.


वातावरणात उष्णता जरी असली तरीसुद्धा त्याची तमा न बाळगता परिसर स्वच्छता करण्यासाठी श्रीसदस्यांचे हात पुढे सरसावत होते. परिसर स्वच्छ करताना चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान दिसून आले, कारण आपण चांगले काम करीत आहेत ही त्यामागची भावना होती. सामूहिक प्रयत्नांनी स्वच्छता मोहीम यशस्वी झाली.



## मोर्बा गावात रमजाननिमित्त खास खवय्यांसाठी चमचमीत खाद्यपदार्थांची पर्वणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मोर्बा गावात मुस्लिम धर्मियांच्या खास पवित्र रमजान महिन्यानिमित्त तोंडाला पाणी सुटेल अशा तिखट-गोड शाकाहारी व मांसाहारी पदार्थांनी तसेच थंडगार पेयांनी विविध दुकाने सजली आहेत. रोजा (उपवास) सोडण्यासाठी हे चमचमीत विविध खाद्यपदार्थ मोर्बा गावात दरवर्षी रमजान महिन्यात बनविले जातात.



रमजान गल्ली मोर्बा गावात प्रसिद्ध आहे. येथे चमचमीत खाद्यपदार्थ खवय्यांसाठी पर्वणी ठरत आहेत. या रुचकर व चवदार पदार्थांमुळे या मोर्बा गावचे नाव रायगड जिल्ह्यासह आसपासच्या जिल्ह्यात सर्वदूर पोहचले आहे.

इस्लाम धर्मात रमजान महिना अत्यंत पवित्र समजला जातो. या महिन्यात संपूर्ण महिनाभर मुस्लिम बांधव पहाटे लवकर उठून अल्लाहच्या (ईश्वराच्या) नावे रोजा धरीत असतात. अन्न-पाणीविना हा रोजा धरला जातो. हे रोजे अत्यंत कडक असतात. या महिन्यात मुस्लिम बांधवांचा नमाज (प्रार्थनेवर) विशेष भर असतो. रमजान महिन्यातील हा रोजा सायंकाळी मगरीबच्या बांगीनंतर सोडला जातो.त्याला इफ्तारी असे म्हणतात. या इफ्तारीसाठी मुस्लिम बांधवांच्या घरांतून विविध खाद्यपदार्थ दररोज बनविले जातात.

मोर्बा गावात खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्यायला खवय्ये विसरत नाहीत. दरवर्षी रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातून खवय्ये विविध पदार्थ खरेदी करण्यासाठी मोर्बा येथे येत असतात. मोर्बा येथील दुकानांतून खास रमजाननिमित्त मावा जिलेबी, हलवा पराठा, रबडी, मालपवा, मँगो मालपवा, ड्रायफ्रूट मालपवा, व्हॅनिला फेरणी, मँगो फेरणी, जिलेबी रबडी, शाही तुकडा, मावा खाजा, ड्रायफ्रूट बर्फी, गुलाबजाम, चिकन तंदुरी, रगडा, भजी, वडा, चिकन समोसा, पंजाबी समोसा, चिकन रोल तसेच थंड पेय, फालुदा, सरबत असे तोंडाला पाणी सुटणारे विविध खाद्यपदार्थ व थंड पेय बनविले जात आहेत.

पहिल्या रोजापासून मोर्बा गावात खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी खवय्यांची गर्दी होत आहे. रात्री उशिरापर्यंत दुकानांमध्ये खवय्ये पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी येत आहेत.

## झुगारेवाडी जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा झुगरेवाडी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल आवड निर्माण व्हावी. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि दैनंदिन जीवनात विज्ञानाचे महत्त्व समजावे या उद्देशाने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



मुख्याध्यापक आणि राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते रवी काजळे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने अनेक उपक्रम राबविले आणि त्याबाबत सर्व शिक्षकवर्गाच्या माध्यमातून हा दिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी.व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या निमित्ताने विज्ञान प्रदर्शन, प्रयोग सादरीकरण, पोस्टर स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा व भाषण स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सौरऊर्जा, पाण्याची शुद्धीकरण प्रक्रिया, पर्यावरण संवर्धन, मानवी अवयव रचना, जलचक्र इत्यादी विषयांवर आकर्षक मॉडेल्स व प्रात्यक्षिकेही सादर केली.

विज्ञान दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला पालक तसेच ग्रामस्थांनी उपस्थिती लावून शिक्षकवर्गाचे आणि सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमात विज्ञान विषयाच्या शिक्षिका राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन करताना विज्ञानाधिष्ठित विचारसरणीची गरज अधोरेखित केली. यावेळी केंद्रप्रमुख लक्ष्मण पादीर आणि जनार्दन निरगुडा हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थी रोहिणा वाघ, दीपिका झुगरे, दर्शना ठोंबरे, मोनिका पारधी, वेदांत म्हात्रे, संग्राम खडके, समीर पारधी, सोनल हुमणे यांनी केले. काही विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून आपला संदेश दिला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी उत्सुकता वाढीस लागली असून शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांना नवे बळ मिळाले आहे.

## माणगावमध्ये श्रीसदस्यांकडून स्वच्छता

**माणगाव : प्रतिनिधी**

ज्येष्ठ निरुपणकार महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव नगरपंचायत व ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.





माणगाव शहरात या स्वच्छता अभियानामध्ये १४७० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. तहसील कार्यालय परिसर, प्रांत कार्यालय, पोलीस स्टेशन, कचेरी रोड, बाजारपेठ, मुंबई गोवा हायवे, निजामपूर रोड, उपजिल्हा रुग्णालय, मोर्बा रोड, जिल्हा परिषद शाळा, बसस्थानक, रेल्वेस्थानक परिसर, महाराण प्रताप नगर रस्ता, पंचायत समिती, स्मशानभूमी आणि मच्छी मार्केट परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्रीसदस्यांनी स्वयंस्फूर्तीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्या उचलून परिसर स्वच्छ केला तसेच गटारामधील ओला कचरासुद्धा स्वच्छ करण्यात आले.

यासाठी एकूण १८ वाहनांचा वापर करुन १९.१८० टन सुका आणि ९.१०० टन ओला असा एकूण २८.२८० टन कचरा उचलण्यात आला. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, नितीन वाढवळ, माजी नायब तहसीलदार सुरेश वाढवळ, माजी गटविकास अधिकारी मारुती चिनके, नगरपंचायत स्वच्छता प्रमुख अतुल जाधव, स्वच्छता निरीक्षक प्रमोद मोरे, प्रांत कार्यालय महसुल सहाय्यक दिनेश पाचाडकर तसेच इतर संघटनांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. गोरेगाव ग्रामपंचायत हद्दीत ५३० श्रीसदस्यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

## पोलादपूर येथ स्वच्छता अभियान यशस्वी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडाच्यामार्फत प्रतिष्ठानचे विश्वस्त पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, रायगड भूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी व राहुलदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शन आणि प्रेरणेतून पोलादपूर येथील श्रीसदस्यांनी महास्वच्छता अभियानाचे यशस्वी आयोजन केले.

पोलादपूर येथील तहसील कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, ग्रामीण रुग्णालय, श्री समर्थ बैठक हॉल ते श्री भैरवनाथ मंदिर कमान रस्ता परिसर, पंचायत समिती परिसर ते सहान रस्ता तसेच मुंबई-गोवा रस्त्याच्या दुतर्फा हे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. सकाळी साडेसात ते दुपारी साडेअकरा वाजेपर्यंत सुरू असलेल्या या अभियानामध्ये सुमारे १६७ श्रीसदस्यांच्या वतीने विविध विभागातून एकूण १३६० सुका कचरा व ५१५ किलो ओला कचरा संकलित करण्यात आला.

पोलादपूर शहरातील महास्वच्छता अभियानामध्ये तहसीलदार कपिल घोरपडे, नगराध्यक्ष स्नेहा मेहता यांनी सहभाग घेतला. यावेळी मान्यवरांनी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने कोणतेही अपेक्षा न ठेवता आरोग्य तपासणी शिबिर, बंधारे निर्मिती, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण यांसारखे राबविण्यात आलेल्या समाजोपयोगी कार्यक्रम तसेच महास्वच्छता अभियानाबद्दलदेखील सर्व श्री सदस्य आणि नागरिक बंधू-भगिनींचे विशेष अभिनंदन केले.

पोलादपूर तालुक्यातील श्रीसदस्य समीर गांधी यांनी मनोगतातून डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. स्वच्छता अभियानासह या सेवाभावी उपक्रमांबद्दल कौतुक करण्यात आले.

# टी-२० वर्ल्डकपमध्ये आज द. आफ्रिका-न्यूझीलंड पहिली उपांत्य लढत

**कोलकाता : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील उपांत्य फेरीतील पहिला सामना उपविजेता दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात खेळवण्यात येणार आहे. कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात ४ मार्चला होणाऱ्या सामन्यात पहिला फायनलिस्ट मिळेल. यंदाच्या हंगामात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने एकही सामना न गमावता उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली आहे. दुसरीकडे न्यूझीलंडचा संघ काठावर पास होऊन स्पर्धेत टिकला आहे. दोन्ही संघांनी एकदाही ही स्पर्धा जिंकलेली नाही. त्यामुळे पहिल्या जेतेपदासाठी कोण आगेकूच करणार ते पाहण्याजोगे असेल. दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात २००५मध्ये पहिला टी-२० सामना खेळवण्यात आला होता. हा सामना न्यूझीलंडच्या संघाने जिंकला होता. त्यानंतर आतापर्यंत या दोन्ही संघात १९ सामने खेळवण्यात आले आहेत. यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने १२, तर न्यूझीलंडच्या संघाने पाच सामने जिंकल्याचा रेकॉर्ड आहे. एकंदर रेकॉर्ड दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने असला तरी मागच्या पाच सामन्यात न्यूझीलंडच्या संघाकडे ३-२ अशी आघाडी आहे. त्यामुळे दोन्ही संघात




तगडी फाईट पाहायला मिळेल, अशी अपेक्षा आहे. टी २० वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासात न्यूझीलंडविरुद्ध दक्षिण आफ्रिकेच्या संघाने एकतर्फी वर्चस्व गाजवले आहे. आतापर्यंत दोन्ही संघात रंगलेल्या पाच सामन्यात द. आफ्रिकेचा संघच भारी ठरला आहे. २००७मध्ये घरच्या मैदानात खेळताना आफ्रिकेने न्यूझीलंडला सहा विकेट्सने मात दिली होती. २००९च्या हंगामात न्यूझीलंडच्या संघाने कडवी टक्कर दिली, पण अवघ्या एका धावेने हा सामना आफ्रिकेने जिंकला होता. २०१०मध्ये १२ धावा आणि २०१४मध्ये दोन धावांनी न्यूझीलंडच्या संघाला शह देणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने यंदाच्या हंगामातील सुपर-८ फेरीत न्यूझीलंडला ७ विकेट्सनी मात दिली होती. न्यूझीलंडच्या संघावर तीन वेळा सेमीफायलमधून बाहेर पडण्याची वेळ आली आहे. २०२१मध्ये ते फायलपर्यंत पोहचले, पण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने चौथ्यांदा सेमी फायलमध्ये धडक मारली आहे. गत हंगामात ते फायनल खेळले, पण टीम इंडियाविरुद्ध त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

### कोकण विभागीय शूटिंग बॉल स्पर्धा उत्साहात

# मॉडेल रांजणखार संघ विजेता

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील फ्रेंड्स ग्रुप संघ रांजणखार आयोजित कोकण विभागीय शूटिंग बॉल स्पर्धा भव्य स्टेडियममध्ये रंगली. या स्पर्धेत मॉडेल संघ रांजणखारने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत रायगडसह सिंधुदुर्ग, पालघर, मुंबई, कल्याण असे अनेक नामवंत संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन शहापूर पंचायत समितीच्या सदस्य भाग्यता पाटील यांच्या हस्ते झाले. या समारंभास नारंगी सरपंच उदय म्हात्रे शिवसेना उपतालुकाप्रमुख डॉ. जगन्नाथ पाटील, फ्रेंड्स ग्रुप संघाचे पदाधिकारी स्वप्नील पाटील, प्रतीक म्हात्रे, योगेंद्र पाटील, समीर म्हात्रे, अनिकेत म्हात्रे, मनोज पाटील आदी उपस्थित होते.




स्पर्धेत कल्याण संघ उपविजेता ठरला. तृतीय क्रमांक बीपीटी मुंबई संघ, चतुर्थ क्रमांक फ्रेंड्स ग्रुप संघ रांजणखार, पाचवा क्रमांक बीएमसी मुंबई, सहावा क्रमांक सिंधुदुर्ग जिल्हा संघ, सातवा क्रमांक वाघ्रण आणि आठवा क्रमांक आरएमएस मुंबई संघाने प्राप्त केला. पारितोषिक वितरण विविध मान्यवर व मंडळाचे पदाधिकारी यांच्या हस्ते झाले.

विशेष म्हणजे मॉडेल संघ रांजणखार संघाने सलग चार वर्ष विजेतेपद जिंकले. मालिकावीर राजेश पाटील, उत्कृष्ट शूटर सचिन व सुयोग पाटील, उत्कृष्ट नेटमन निहाल म्हात्रे, तर भूषण मिस्त्री पब्लिक हिरो ठरला. त्यांनाही बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# कबड्डी स्पर्धेत धाटाव संघाने मारली बाजी

**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य कबड्डी स्पर्धा जय हनुमान स्पोर्ट्स वाशी यांच्या उत्कृष्ट आयोजनाखाली मोठ्या उत्साहात पार पडली. जोरदार चढाया, भक्कम पकडी आणि शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या अटीतटीच्या सामन्यांमुळे मैदानावर कबड्डीचा थरार प्रेक्षकांना अनुभवायला मिळाला.



या स्पर्धेत सोनारसिद्ध धाटाव संघाने आक्रमक खेळ, अचूक नियोजन आणि सांघिक समन्वयाच्या जोरावर विजेतेपदावर आपले नाव कोरले. सापया वरसगाव संघाने द्वितीय, जय हनुमान वाशी संघाने तृतीय, तर उंबर्डी संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

वाशी विरुद्ध धाटाव उपांत्य सामना अत्यंत चुरशीचा ठरला. दोन्ही संघांनी प्रत्येकी पाच चढाया करत मैदानावर दमदार खेळ सादर केला. प्रत्येक गुणासाठी झालेल्या झुंजीत अखेर धाटाव संघाने संयमी आणि धारदार खेळ करत फायनलमध्ये दमदार प्रवेश केला.

धाटाव विरुद्ध वरसगाव अंतिम सामना शेवटच्या क्षणापर्यंत तितकाच रोमांचक राहिला. निर्णायक क्षणी धाटावचा स्टार खेळाडू आर्यन रटाटे मैदानात उतरला आणि प्रतिस्पर्ध्यांच्या बचावफळीला चकवत तीन+दोन अशा तब्बल पाच गुणांची विजयी सुपर रेड करत सामना धाटावच्या बाजूने फिरवला. या एका चढाईने मैदानात जल्लोष उसळला आणि धाटावने दिमाखात विजेतेपद पटकावले. त्यांना पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेतील वैयक्तिक मानकरी मालिकावीर आर्यन रटाटे (धाटाव), उत्कृष्ट चढाईपटू सोहम पोटफोडे (वरसगाव), उत्कृष्ट पकड अभिषेक घालंदे (उंबर्डी) आणि पब्लिक हिरो विघ्नेश बामणे (वाशी) या खेळाडूंना वैयक्तिक बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

## पंच विनीत कुलकर्णी, अध्यक्ष अजय देशपांडे यांचा सत्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) वतीने रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर वरिष्ठ गटाच्या १५ सामन्यांचे आयोजन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) पुढाकाराने करण्यात आले आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे पहिले युवा आंतरराष्ट्रीय पंच विनीत कुलकर्णी आणि महाराष्ट्र क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष अजय देशपांडे यांची नियुक्ती एमसीएतर्फे करण्यात आली आहे. पेण येथील सामन्याचा पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर दोघांचाही आरडीसीतर्फे सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष राजेश पाटील, खजिनदार प्रशांत ओक, पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष अरुण शिंदे, देवेंद्र पाटील, श्याम पाटील, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, रणजीपटू योगेश पवार, दिनेश सावंत, दिलीप लाड, शेखर भगत, एमसीए पंच सुयोग चौधरी, चंद्रकांत चौधरी, ॲड.पंकज



पंडित, रायगडचा कर्णधार रवी सोलंकी, सीडीए संघाचा कर्णधार विश्वजित जगदाळे यांच्यासह दोन्ही संघांचे खेळाडू व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

यावेळी आंतरराष्ट्रीय पंच विनीत कुलकर्णी यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, क्रिकेट खेळाचे खरे हिरो हे खेळाडू असून पंच हे निरीक्षक व नियमांचे पालन करून निर्णय देणारी व्यक्ती आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन सध्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असून गेल्या दोन वर्षात एमसीए इन्व्हिटेशन स्पर्धेतील विविध वयोगटाच्या ६० सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे तसेच असोसिएशनकडून एमसीए प्रमाणित पंचांची व गुणलेखकांची संख्याही दर वर्षी वाढत असल्याचा आपल्याला नक्कीच आनंद आहे.

महाराष्ट्र क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष अजय देशपांडे यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यात जास्तीत जास्त चांगल्या दर्जाचे सामने व्हावेत अशी आमची इच्छा आहे. भविष्यात एमसीएचे महत्त्वाचे सामनेसुद्धा जिल्ह्यात होऊ शकतात. त्यासाठी चांगल्या दर्जाचे मैदान व उत्तम खेळपट्टी तयार करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जिल्हा असोसिएशन कडे स्वतःचे मैदान असावे यासाठी प्रयत्नशील आहे, ही चांगली बाब आहे.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील म्हणाले की, जिल्हा असोसिएशनकडून चांगल्या पद्धतीने क्रिकेट खेळाचा विकास कसा होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आणखी जास्त चांगल्या दर्जाचे मैदान व खेळपट्टी तयार करण्यासाठी केलेल्या सूचनांचे पालन करून आपण प्रगतीच्या दिशेने सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करूया.

# गोरेगाव संघाने पत्रकार चषक जिंकला

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार चषक क्रिकेट क्रिकेट स्पर्धेत गोरेगाव प्रेस क्लबने विजेतेपद पटकावले. यजमान अलिबाग प्रेस असोसिएशनचा संघ उपविजेता ठरला. महाड प्रेस असोसिएशनने तृतीय, तर पेण प्रेस क्लबने चतुर्थ क्रमांक मिळवला.



अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे रविवारी रायगड जिल्हा क्रीडा संकुल नेहुली येथे पत्रकारांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, आरसीएफचे निवृत्त जनसंपर्क अधिकारी संतोष वझे, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे आदी उपस्थित होते.

गोरेगाव संघाचा आदिनाथ गोविलकर या स्पर्धेचा मानकरी ठरला. अलिबागचा प्रदीप ठाकूर याची उत्कृष्ट गोलंदाज म्हणून, तर पेण संघाचा नित्यानंद पाटील याची उत्कृष्ट फलंदाज म्हणून निवड करण्यात आली.

सहयोग पतसंस्थेचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा पतसंस्थांचा महासंघाचे सेक्रेटरी योगेश मगर, सनदी लेखापाल संजय राऊत, नागेश कुलकर्णी आदींच्या उपस्थित स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.





उरण : स्व.लक्ष्मण संतू पाटील (अण्णा) युवा प्रतिष्ठान भंगारपाडातर्फे पाणदिवे येथे अण्णा स्मृती चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ.अरुणकुमार भगत यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास अध्यक्ष हेमंत पाटील, सामाजिक कार्यकर्ते भाई लक्ष्मण पाटील, अ.भा.म.ख.सं.अध्यक्ष विश्वनाथ म्हात्रे, शिक्षण सेना जिल्हाध्यक्ष नरेश मोकाशी, गणेश पाटील, दिघोडेचे माजी सरपंच अविनाश पाटील, वशेणीचे माजी सरपंच प्रसाद पाटील, अरविंद पाटील, निलेश पाटील, संतोष पाटील, महेश पाटील, समाधान पाटील, सुशांत पाटील, सौरव पाटील आदी उपस्थित होते.

# वर्ल्डकप सेमी फायनलमध्ये उद्या भारतासमोर इंग्लंडचे आव्हान

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील दुसरा उपांत्य सामना येत्या गुरुवारी (दि.५) मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर रंगणार आहे. या सामन्यात भारतासमोर दोन वेळचा विजेता इंग्लंडचा संघ समोर असणार आहे. भारताचा फॉर्म चांगला आहे, पण इंग्लंड हा मोठ्या स्पर्धांमध्ये जोरदार कामगिरी करणारा संघ म्हणून ओळखला जातो. त्यामुळे हा सामना भारतासाठी खूप महत्त्वाचा आहे.




इंग्लंडचा या स्पर्धेतील प्रवास सुरुवातीला लवकरच संपणार असे वाटत होते. काही सामने त्यांनी कठीण परिस्थितीत जिंकले, मात्र प्रत्येक वेळी एखाद्या खेळाडूने पुढाकार घेत संघाला वाईट परिस्थितीतून बाहेर काढले. हीच त्यांची सर्वात मोठी ताकद आहे. संघात अनेक मॅच विनर्स आहेत.

विल जॅक्स हा या स्पर्धेत इंग्लंडसाठी खऱ्या अर्थाने 'एक्स-फॅक्टर' ठरला आहे. त्याने मधल्या फळीत आक्रमक फलंदाजी करत संघाला वेग दिला. जवळपास १७६च्या स्ट्राइक रेटने केलेल्या धावांमुळे तो भारतासाठी मोठे आव्हान ठरू शकतो. फक्त फलंदाजीच नव्हे, तर त्याने गोलंदाजीतही सात विकेट्स घेतल्या आहेत. त्यामुळे तो सामना कधीही फिरवू शकतो. भारतीय संघाने त्याला लवकर बाद करणे गरजेचे आहे.

आदिल राशिद हा अनुभवी लेगस्पिनर आहे. भारतीय फलंदाजांविरुद्ध त्याचा चांगला रेकॉर्ड आहे. मधल्या षटकांत तो कमी धावा देतो आणि महत्त्वाच्या विकेट्स घेतो. त्यामुळे भारतीय फलंदाजांनी संयम ठेवून खेळणे गरजेचे आहे.

सॅम करन हा टी-२० क्रिकेटमध्ये मोठ्या सामन्यांचा खेळाडू मानला जातो. तो खालच्या फळीत जलद धावा करू शकतो आणि गोलंदाजीत डेथ ओव्हर्समध्ये विकेट्स काढतो. आयपीएलमध्ये खेळल्यामुळे भारतीय खेळपट्ट्यांची त्याला सवय आहे. भारताला सॅम करनचा सामना करणे अवघड आहे.

फिल सॉल्ट हा पॉवरप्लेमध्ये आक्रमक फलंदाजी करणारा खेळाडू आहे. तो सुरुवातीलाच गोलंदाजांवर दबाव आणतो. जर त्याने पहिल्या सहा षटकांत मोठे फटके मारले, तर भारताला लवकर रणनीती बदलावी लागू शकते. त्याला लवकर बाद करणे हे भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूक हा शांत आणि आत्मविश्वासू खेळाडू आहे. तो कठीण परिस्थितीत मोठी खेळी करू शकतो. सुपर-८ फेरीत त्याने शतक झळकावत संघाला संकटातून बाहेर काढले होते. स्पिनविरुद्ध त्याची क्षमता चांगली आहे. मोठ्या सामन्यांतील त्याचा आत्मविश्वास इंग्लंडसाठी महत्त्वाचा आहे. भारताकडेही दमदार गोलंदाजी आणि फलंदाजी आहे, मात्र सेमीफायनलमध्ये छोट्या चुका महागात पडू शकतात. पॉवरप्लेमधील गोलंदाजी, मधल्या षटकांत स्पिनचा वापर आणि डेथ ओव्हर्समधील नियंत्रण हे निर्णायक ठरणार आहे.

### वानखेडे स्टेडियमवर ब्लॉकबास्टर लढत

वानखेडे स्टेडियमची खेळपट्टी फलंदाजांसाठी अनुकूल मानली जाते. त्यामुळे मोठा स्कोअर पहायला मिळू शकतो. दबावाखाली कोणता संघ शांत राहतो आणि योग्य निर्णय घेतो यावर निकाल अवलंबून असेल. एकूणच हा सामना थरारक असणार आहे. इंग्लंडचे पाच खेळाडू भारतासाठी मोठे आव्हान निर्माण करू शकतात. भारताला अंतिम फेरी गाठायची असेल, तर योग्य रणनीती आखावी लागेल. क्रिकेटप्रेमींसाठी हा सामना खऱ्या अर्थाने 'ब्लॉकबस्टर' ठरणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com